बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादक:बाळासाहेब मस्के

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

बीड | मंगळवार दि.२४ जून २०२५ | वर्षे४थे | अंक२९८वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## 'पाकिस्तानला आता पाणी देण्यात येणार नाही'

**नवी दिल्ली :** 'इंडस वॉटर ट्रीटी' आता पुन्हा कधीच बहाल केला जाणार नाही. पाकिस्तानला आता पाणी देण्यात येणार नाही, त्यांना उपासमारीसारखी स्थिती ओढवेल', असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पाकिस्तानबाबत भारताने घेतलेल्या कडक भूमिकेचा पुनरुच्चार करत स्पष्ट केले.



२२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान संबंध अधिकच तणावपूर्ण झाले. या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानच्या नागरिकांना देशाबाहेर पाठविण्यासारखे अनेक निर्णय घेतले. इंडस वॉटर ट्रीटी तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले. आंतरराष्ट्रीय करार एकतर्फी रद्द करता येत नाहीत, पण आम्हाला ते थांबवण्याचा हक्क आहे आणि तो आम्ही वापरला आहे,' असे शहा यांनी सांगितले.

भारताला जे पाणी कायदेशीररीत्या मिळायला हवे, ते आम्ही वापरणार. एक कालवा बांधून ते पाणी पाकिस्तानऐवजी राजस्थानमध्ये वळवले जाईल. हल्ल्यावर प्रतिक्रिया देताना शहा म्हणाले, पहलगाम येथील हल्ला काश्मीरमध्ये शांतता बिघडवण्याचा व वाढत्या पर्यटनाला थांबवण्याचा प्रयत्न होता. काश्मीर खोऱ्याने यापूर्वी इतकी एकजूट भारतासोबत कधीच दाखवलेली नव्हती. पाकिस्तानकडून भारतातील नागरी भागांवर हल्ले झाल्यानंतर भारतानेही जोरदार प्रत्युत्तर दिले. आपण पाकिस्तानच्या हवाई तळांवर कारवाई केली, ज्यामुळे त्यांना संघर्षविरामासाठी विनंती करावी लागली, असे शहा यांनी स्पष्ट केले.

# योग्य वेळी कर्जमाफीचा निर्णय

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात अद्याप कोणताही निर्णय घेतला नाही, मग सरकारने कर्जमाफीचा शब्द फिरवलाय का? असा प्रश्न माध्यमांच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारला असता, मी याआधी देखील याबाबत अतिशय सविस्तर सांगितलं आहे. कर्जमाफी कधी करायची? याबद्दल काही नियम आहेत. त्या संदर्भात त्याची एक पद्धत आहे. तसेच महायुतीच्या सरकारने दिलेला एकही शब्द हे सरकार फिरवणार नाही. योग्य वेळी राज्य सरकार कर्जमाफीचा निर्णय घेईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या आधी महायुतीच्या नेत्यांनी राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. त्यानंतर विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार स्थापन होऊन जवळपास सहा महिने होऊन गेले तरी अद्याप कर्जमाफीचा कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे निवडणुकीत महायुतीने जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता अद्यापही सरकारकडून होताना पाहायला मिळत नाही. त्यामुळे सरकार सत्तेत आल्यानंतर महायुतीच्या नेत्यांनी दिलेलं आश्वासन हवेतच विरले का? असा सवाल विरोधक करत आहेत.

यातच काही दिवसांपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार की नाही? याबाबत मोठे विधान केले होते. अजित पवार यांनी शेतकऱ्यांना कर्जाचे पैसे भरण्याचे सांगितले होते. 'सगळी सोंगे करता येतात, पण पैशाचे सोंग करता येत नाही', असं म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी पीक कर्जाची परतफेड करण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे महायुतीने दिलेला कर्जमाफीचा शब्द फिरवलाय का? असा सवाल उपस्थित करण्यात येत होता.

पण यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका मांडली आहे. तसेच निवडणुकीमध्ये प्रचारादरम्यान महायुतीने जनतेला दिलेला एकही शब्द हे सरकार फिरवणार नसल्याचे सांगत योग्य वेळी राज्य सरकार कर्जमाफीचा निर्णय घेईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (२१ जून) पुण्यात माध्यमांशी बोलताना सांगितले आहे.



### आळंदीजवळील प्रस्तावित कत्तलखान्याचे आरक्षण रद्द

■ पिंपरी-चिंचवड महापालिका सुधारित विकास आराखड्यामध्ये (डीपी) प्रस्तावित केलेला मोशी व तीर्थक्षेत्र आळंदीच्या परिसरातील कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करण्यात येईल. वारकरी, भूमिपुत्र आणि शेतकऱ्यांच्या श्रद्धेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

■ संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा आषाढी वारी पायी पालखी सोहळा पुण्यात दाखल झाला आहे. या ठिकाणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पालखीचे दर्शन घेतले आणि वारकऱ्यांशी संवाद साधला. दोन दिवसांपूर्वी, पिंपरी-चिंचवडमध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पणाच्या झालेल्या कार्यक्रमामध्ये मोशी येथील प्रस्तावित कत्तलखाना आरक्षण रद्द करण्याबाबत ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले होते. भाजपा आमदार महेश लांडगे यांनीही महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती.

■ पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीमध्ये आळंदी शहराजवळ कत्तलखान्याचे आरक्षण विकास आराखड्यामध्ये टाकण्यात आले आहे. त्यामुळे श्रीक्षेत्र आळंदीसारख्या देवस्थानाच्या परिसरामध्ये अशा पद्धतीने कत्तलखान्याचे आरक्षण टाकण्यात आल्याने वारकऱ्यांकडून नाराजी व्यक्त केली जात होती.

■ पुण्यामध्ये माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, जो काही विकास आराखडा आहे. त्या विकास आराखड्यामध्ये मोशी-आळंदी येथे कत्तलखाण्याचे आरक्षण दाखवण्यात आले आहे. मात्र कुठल्याही परिस्थितीमध्ये कत्तलखाना होऊ दिला जाणार नाही. त्याबाबतच्या आरक्षण वगळण्याच्या आदेश मी दिले आहेत. वारकऱ्यांना आणि वारकरी नेत्यांना सांगू इच्छितो कोणत्याही परिस्थितीत कत्तलखाना होणार नाही.



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शनिवारी विशाखापट्टणम (आंध्र प्रदेश) येथे योग सत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनीही सहभाग घेतला. यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' अशी आहे. ओपेरा हाऊसच्या पायऱ्यांपासून ते एव्हरेस्टच्या शिखरापर्यंत आणि विशाल समुद्रापर्यंत एकच संदेश आहे की, योग सर्वांसाठी आहे. सर्व सीमा आणि क्षमतेच्या पलीकडे योग आहे, अशा शब्दांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी योगाचे महत्त्व विषद केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'एक पेड माँ के नाम' या प्रेरणादायी अभियानांतर्गत कुडाळ-पडवे येथील एसएसपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये राज्याचे माजी मुख्यमंत्री व खासदार नारायण राणे यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला. यावेळी सिंधुदुर्ग जिल्हा बँक अध्यक्ष मनीष दळवी, डॉक्टर कुलकर्णी व हॉस्पिटलचे कर्मचारी उपस्थित होते. **(छाया : योगिराज खानविलकर)**

## 'ऑपरेशन सिंधू'द्वारे शेजारी देशांना मदतीचा हात

### नेपाळी, श्रीलंकन नागरिकांनाही इराणमधून आणणार

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

इराण-इस्रायल संघर्षात अडकलेल्या नेपाळी आणि श्रीलंकन नागरिकांना, भारत ऑपरेशन सिंधूच्या माध्यमातून इराणमधून बाहेर काढण्यासाठी मदत करणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी दिली आहे. दोन्ही देशांनी विनंती केल्यानंतर केंद्र सरकारने हा निर्णय घेतला आहे.

गेल्या आठवड्यापासून इस्रायलने इराणच्या आण्विक महत्त्वाकांक्षा रोखण्यासाठी ऑपरेशन रायझिंग लायन सुरू केल्यामुळे मध्य पूर्वेत तणाव वाढला आहे. या दोन्ही देशांमध्ये अडकलेल्या भारतीय नागरिकांना बाहेर काढण्यासाठी भारताने ऑपरेशन सिंधू सुरू केले होते. नेपाळ व श्रीलंका सरकारच्या विनंतीनुसार, इराणमधील भारतीय दूतावास सध्या तेथे अडकलेल्या भारतीय नागरिकांना बाहेर काढत आहे. भारतीय दूतावास तेथील नेपाळ आणि श्रीलंकेतील नागरिकांनाही परत आणणार आहे. ऑपरेशन सिंधूच्या माध्यमातून इराणच्या संघर्षग्रस्त भागात अडकलेल्या भारतीय नागरिकांना शनिवारी एक विशेष विमान सकाळी तुर्कमेनिस्तानमधील अश्गाबात येथून दिल्लीत दाखल झाले होते. शुक्रवारी रात्री उशिरा आणखी एका विशेष विमानातून २९० भारतीय विद्यार्थी भारतात दाखल झाले आहेत. यातील बहुतेक विद्यार्थी जम्मू आणि काश्मीरमधील होते. ते इराणमधील मशहाद शहरात होते. या दोन्ही देशांमध्ये विद्यार्थी, यात्रेकरू, संशोधक आणि कामगारांसह लाखो भारतीय नागरिक अडकले आहेत.



## लाडक्या बहिणींना मुंबई बँक देणार मदतीचा हात

### शासनाच्या ४ महामंडळांच्या विविध योजनांतून एक लाखांचे मिळणार शून्य दराने कर्ज

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या मुंबईतील महिलांना शून्य टक्के व्याजराने तब्बल १ लाख रुपयांचे कर्ज देण्याचा निर्णय मुंबई बँकेने घेतला आहे. मुंबै बँकेचे अध्यक्ष तथा भाजपा आमदार प्रवीण दरेकर यांनी ही माहिती दिली आहे. महायुती सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनल्या आहेत. काही महिलांनी छोटे-मोठे उद्योगधंदेही सुरू केले. त्यानंतर आता या योजनेंतर्गत मुंबईतील महिलांना शून्य टक्के व्याज दराने १ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडक्या बहिणींचे पैसे उद्योग-व्यवसायाच्या माध्यमातून बाजारात आणण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यामुळे आम्ही लाडक्या बहिणींना ९ टक्के व्याजदराने करण्यात येणारा कर्जपुरवठा शून्य टक्के दराने करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्रवीण दरेकर यांनी सांगितले आहे.

सरकारच्या ४ महामंडळाच्या योजना अशा आहेत की, १२ टक्क्यांपर्यंतच्या व्याजाचा परतावा लाभार्थींना दिला जातो. पर्यटन महामंडळाची आई योजना, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ, भटक्या विमुक्तांसाठीचे महामंडळ आणि ओबीसी महामंडळांच्या योजनांमधून व्याजाचा परतावा महिलांना दिला जात असल्याचे दरेकर यांनी सांगितले.

### उद्योजिका बनण्याच्या स्वप्नांना बळ देणारा निर्णय

उल्लेखनीय बाब म्हणजे प्रवीण दरेकर यांनी एका पोस्टद्वारेही मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या या निर्णयाची माहिती दिली होती. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या लाडक्या बहिणींच्या उद्योग-व्यवसायासाठी आणलेल्या कर्ज धोरणास राज्य सरकारच्या व्याज परतावा योजनेची सांगड घालून शून्य टक्के व्याजदरात कर्ज देऊन महिलांना उद्योग व्यवसायात स्वावलंबी करण्याचा निर्णय शनिवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत घेतला.

## वेचक

### आजपासून राजकोट किल्ला पर्यटकांसाठी बंद

**मालवण :** छत्रपती शिवाजी महाराजांचा मालवणमधील किल्ल्यावरील पुतळा कोसळल्याची दुर्घटना घडल्यानंतर राज्यभरातून शिवप्रेमींना संताप व्यक्त केला होता. शिवप्रेमींच्या संतापानंतर राज्य सरकारने पुन्हा नव्याने तितकाच रुबाबदार आणि मोठा पुतळा बसविण्याचा शब्दही दिला होता, त्यानुसार आता मालवण किल्ल्यावर शिवरायांचा नवा पुतळा दिमाखात उभारला आहे. शिवरायांचा नवा पुतळा बसवल्यानंतर चबुतऱ्याजवळ काही काम बाकी असल्याचे किंवा काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा व्हीडिओ समोर आला होता. त्यानंतर येथील प्रशासनाने दखल घेतली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या मालवणमधील समुद्र तटबंदीवरील राजकोट किल्ला रविवारपासून पुढील काही दिवस शिवप्रेमी आणि पर्यटकांसाठी बंद राहणार आहे.

### वेण्णा लेक 'ओव्हर फ्लो'

**सातारा :** महाराष्ट्राचे मिनी काश्मीर म्हणून ओळख असलेल्या महाबळेश्वरचा वेण्णा लेक पूर्ण क्षमतेने भरून ओव्हर फ्लो झाला आहे. महाबळेश्वरमध्ये सुरू असलेल्या दमदार पावसामुळे वेण्णा लेक हा यावर्षी जून महिन्यात पूर्ण क्षमतेने भरल्याने लेकच्या सांडव्यातून पाणी वाहण्यास सुरुवात झाली आहे. मागील वर्षी जुलै महिन्यात हा तलाव भरला होता. त्यामुळे महाबळेश्वर आणि पाचगणी या दोन्ही शहरांचा पाणीप्रश्न मिटला आहे.

## मुंबईकरांवरील टळले पाणीकपातीचे संकट

### सप्टेंबरपर्यंत पुरेल एवढा तलावांमध्ये पाणीसाठा

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही तलावांमध्ये सध्या २५ टक्के पाणीसाठा झाल्याने पाणी कपातीचे संकट टळले आहे. जमा झालेले पाणी मुंबईला पुढील ९५ दिवसांसाठी म्हणजेच सप्टेंबरपर्यंत पुरेल एवढे आहे. त्यामुळे मुंबईवरील पाणीकपातीचे संकट टळले आहे.

मुंबईला मोडक सागर, मध्य वैतरणा, अप्पर वैतरणा, भातसा, तानसा, विहार व तुळशी या सात धरणांतून दररोज ३ हजार ८५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होतो. मुंबईची वर्षभराची तहान भागवण्यासाठी सातही धरणांत १ ऑक्टोबर रोजी १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर पाणी जमा होणे गरजेचे असते. या साठ्यानुसार मुंबईच्या वर्षभराच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन केले जाते.



वर्षभर लागणारे पाणी जमा होण्यासाठी जूनपासून तलाव क्षेत्रात जोरदार पाऊस होणे गरजेचे असते. मात्र, या वर्षी मेअखेर सुरू झालेल्या पावसाने सुरुवातीचा काही काळ धरण क्षेत्राकडे पाठ फिरवल्याने जलसाठा १० टक्क्यांपर्यंत खाली आला होता. मात्र जूनमध्ये गेल्या दोन आठवड्यांत बरसलेल्या मान्सूनने कसर भरून काढली. सध्या या धरणांमध्ये २५ टक्के पाणी जमा झाले आहे. यातच हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहणार असल्यामुळे मुंबईवरील पाणीसंकट टळले आहे.

## इराणसोबतच्या युद्धामुळे इस्रायलला आर्थिक संकटाचा विळखा

◆ **तेल अवीव (वृत्तसंस्था) :**

इराण आणि इस्रायल यांच्यात चालू असलेला संघर्ष आता केवळ दोन्ही देशांच्या सैन्यापुरता मर्यादित राहिलेला नाही तर हा संघर्ष आता आर्थिक संकटातही परिवर्तित झाला आहे. इस्रायलचे माजी संरक्षण सल्लागार ब्रिगेडियर जनरल रीम एमीनाक यांच्या माहितीनुसार, सध्या इस्रायल दररोज युद्धावर सुमारे ७२५ दशलक्ष डॉलर (सहा हजार कोटी रुपये) खर्च करत आहे. या खर्चामध्ये प्रामुख्याने मिसाईल्स, जेट इंधन, बॉम्ब फेकणे आणि सैन्य तैनाती यांचा समावेश आहे.

इराण-इस्रायल संघर्ष लवकर संपण्याची चिन्हे नाहीत. वाढता संरक्षण खर्च, गडगडणारा जीडीपी आणि वाढती बजेट तूट यामुळे इस्रायलच्या अर्थव्यवस्थेवर जबरदस्त दबाव येत आहे. या संघर्षाचे परिणाम जागतिक बाजारपेठांवर आणि ऊर्जा क्षेत्रावरही मोठ्या प्रमाणावर जाणवत आहेत.

१३ जून रोजी इराणवर इस्रायलने केलेल्या प्रतिआक्रमणानंतर फक्त पहिल्या दोन दिवसांतच १.४५ अब्ज डॉलर (१२,५०० कोटी रुपये) खर्च झाले. यापैकी ५ हजार कोटी रुपये बॉम्ब आणि इंधनावर, तर उर्वरित रक्कम इतर संरक्षण खर्चावर झाली आहे. इस्रायलच्या संरक्षण बजेटमध्ये मोठी वाढ झाली आहे. २०२३ मध्ये जे बजेट १५ अब्ज डॉलर होते, ते आता २०२५ मध्ये ३१ अब्ज डॉलर होणार आहे. हा खर्च जीडीपीच्या जवळपास ७ टक्क्यांपर्यंत जातो. या वाढीमुळे आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रावर परिणाम होण्याची शक्यता आहे.



**आंतरराष्ट्रीय बाजारांवर परिणाम :** अमेरिकेकडून इस्रायलने नवीन डिफेन्स सिस्टिम आणि निधी मागितला आहे. सध्या इस्रायलला अमेरिका प्रत्येक वर्षी अंदाजे ३० हजार कोटी रुपये संरक्षण मदत देतो, त्यापैकी ४५०० कोटी रुपये आयरन डोम आणि एयरो सिस्टिमसाठी असतात. ही मदत 'इस्रायल फंड' म्हणून ओळखली जाते. या युद्धाचा परिणाम जगभरात उमटताना दिसत आहे. कच्च्या तेलाचे दर ५ टक्क्यांनी वाढले असून ब्रेंट क्रूड ७४.६० डॉलर प्रति बॅरल इतके झाले आहे. तसेच, एस ॲण्ड पी ५०० आणि आशियाई शेअर बाजारात घसरण नोंदवली गेली आहे. याशिवाय, जलमार्गांवरील धोक्यामुळे ऊर्जा पुरवठ्यावरही परिणाम होऊ लागला आहे.

## महाराष्ट्र निवडणुकीचे सीसीटीव्ही फुटेज देण्यास नकार

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदारयाद्यांमध्ये प्रचंड गोंधळ केल्याचा आरोप करत निवडणूक आयोगाकडे मतदान केंद्रांचे सीसीटीव्ही फुटेज मागणाऱ्या काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना आयोगाने नकार दिला आहे. असे केल्यास मतदारांच्या गोपनीयतेचे व सुरक्षिततेला धोका निर्माण करणारे ठरेल असे आयोगाने म्हटले आहे.

काँग्रेसने केलेली मागणी ही त्यांच्यासाठी ठीक असली, मतदारांच्या हिताची असली किंवा लोकशाही प्रक्रियेच्या संरक्षणासाठी योग्य असली तरी प्रत्यक्षात त्याचा उद्देश अगदी उलट उद्दिष्ट साध्य करण्याचा असल्याचे या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह हजारो वारकऱ्यांसह केली योगासने

## आंतरराष्ट्रीय योग दिन महाराष्ट्रामध्ये उत्साहात साजरा

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन शनिवारी उत्साहात साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय योग दिन भारतासह महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात शेकडो वारकऱ्यांबरोबर योग दिन साजरा केला आहे. राज्य सरकारच्या पुढाकाराने 'वारकरी भक्तीयोग' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वारकरी भक्तियोग या उपक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रमुख उपस्थिती लावत हजारो वारकरी, विद्यार्थ्यांबरोबर योगासने केली. या कार्यक्रमासाठी प्रशासनाने मोठी तयारी देखील केली होती.

शिवसेना (शिंदे) पक्षाचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मरिन ड्राइव्ह या ठिकाणी आयोजित योग सत्रात सहभाग घेत योगासने केली आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त नागपूरच्या यशवंत स्टेडियम धंतोली येथील ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला होता.

### मंत्री चंद्रकांत पाटील यांचा योग सत्रात सहभाग



भाजपाचे तथा मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पुण्यातील कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले की, 'आषाढी वारीच्या निमित्ताने संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या पुण्यात मुक्कामी दाखल झाल्या आहेत. यंदा त्याच वेळी जागतिक योग दिन आला असल्याने उच्च व तंत्रशिक्षण विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे महापालिका, राष्ट्रीय सेवा योजना, श्रीक्षेत्र आळंदी, श्रीक्षेत्र देहू, विद्यार्थी विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे विद्यापीठातील खाशाबा जाधव क्रीडा संकुलात अलौकिक भक्तियोग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत लाखो वारकऱ्यांनी योगाभ्यास केला. आजचा हा भक्ती-शक्तीचा संगम असलेला कार्यक्रम वेगळीच अनुभूती देणारा होता', असे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे.

### सोन्याचा भाव

| | |
|---|---|
| २४ कॅरेट प्रति तोळा | १,००,७५० रुपये |
| २२ कॅरेट प्रति तोळा | ९२,३५० रुपये |

### चांदीचा भाव

| | |
|---|---|
| प्रति किलो | १,००,४८० रुपये |

## एअर इंडियाच्या तीन कर्मचाऱ्यांना काढण्याचे आदेश

### ऑपरेशनल चुकांसाठी जबाबदार असल्याचा डीजीसीएचा दावा

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था):**

भारताच्या नागरी उड्डयन महासंचालनालयाने (डीजीसीए) एअर इंडियामधील क्रू शेड्युलिंग आणि रोस्टरिंगशी संबंधित गंभीर चुकांची दखल घेतली आहे. या निष्काळजीपणासाठी जबाबदार असलेल्या तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्या सर्व संबंधित जबाबदाऱ्यांमधून तातडीने हटवण्याचे निर्देश डीजीसीएने दिले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हे तिन्ही अधिकारी ऑपरेशनल चुकांसाठी जबाबदार आढळले असून, त्यांना आता कोणत्याही क्रू व्यवस्थापन कामापासून दूर ठेवले जाईल.

डीजीसीएने एअर इंडियाला या अधिकाऱ्यांविरोधात त्वरित अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याचे आणि त्याची प्रगती तसेच अंतिम परिणाम १० दिवसांच्या आत डीजीसीएला सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. विमान कंपन्यांच्या सुरक्षा आणि परिचालन मानकांमध्ये पारदर्शकता व जबाबदारी सुनिश्चित करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# संघर्षाचे परिणाम भारतावर

इराण आणि इस्त्रायल यांच्यात सध्या भीषण संघर्ष सुरू आहे आणि त्याची किंमत भारताला मोजावी लागणार आहे. त्याची किंमत न भूतो न भविष्यती अशी आहे. इस्त्रायलने इराणच्या आण्विक स्थळांवर तसेच त्यांच्या युरेनियम समृद्ध तळांवर हल्ले केले आणि त्यामुळे इराणला फार मोठे नुकसान सोसावे लागले. इराणचे लष्करी अधिकारी जे सर्वोच्च आहेत तेही या कारवाईत ठार झाले. इराणने इस्त्रायलवर हल्ले केले, पण त्यांची व्याप्ती इस्त्रायलच्या तुलनेत काहीच नव्हती. परिणामी भारताला आता नव्या पश्चिम आशियातील युद्धबिंदूला सामोरे जावे लागणार आहे. डावपेचात्मक वर्तुळात इस्त्रायलच्या या चालीचा खूप दिवसांपूर्वीपासून अंदाज व्यक्त केला जात होता. पण आता ती चाल रचली गेली आहे आणि त्याची किंमत इराणला मोजावी लागत आहे. तसेच जगालाही मोजावी लागणार आहे. ही अशी घटना आहे, की जिचे नवी दिल्लीत स्वागत केले जाणार नाही. कारण इस्त्रायल आणि इराण हे दोन्हीही देश भारताचे मित्र देश आहेत. इराणबरोबर तर भारताचे पूर्वापार मैत्री पूर्ण संबंध आहेत, तर इस्त्रायलने भारताला पाकिस्तानसोबत नुकत्याच झालेल्या संघर्षात चांगली साथ दिली आहे. त्यामुळे भारतासमोर असा पेच आहे की कुणाचीही बाजू घेता येत नाही. तरीही भारताला आपले अलिप्तता वादाचे धोरण समोर ठेवून या संघर्षात भूमिका घ्यावी लागणार आहे. इराणचा निर्णायक पराभव झाला अथवा त्याच्या अगदी जवळचे म्हणजे इराण कोसळले तरीही भारतात त्याचे फार मोठे परिणाम होणार आहे. मग भारताला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. भारताने आपली ऊर्जा सुरक्षा उभी केली आहे ती इराणसारख्या मित्र देशांच्या भरवशावर. इराण कोसळला, तर भारताला ऊर्जेचा पुरवठा होणार नाही आणि मग भारताला पुन्हा पूर्ववत पश्चिमी देशांकडे पाहावे लागेल. ते शक्य नाही कारण पश्चिमी देश आज जरी भारताचे मित्र असले तरीही बदलत्या परिस्थितीत भारताची साथ देतीलच असे नाही. सर्वात भयंकर तडाखा भारताला बसेल तो क्रूड ऑईल आयातीवर. सध्या भारताची क्रूड तेलाची आयात इराणद्वारेच होते आणि ती केली जाते होर्मुझच्या बंदरातून. त्या प्रदेशात कुठेही युद्ध सुरू झाले की ती युद्धभूमी होते आणि त्यामुळे भारताच्या क्रूड तेलाच्या किमती १५० प्रति बॅरल इतक्या चढू शकतात. त्यामुळे तेलाच्या किमती वाढल्या की, देशांतर्गत महागाई वाढते आणि व्यापारी असमतोल निर्माण होतो. चलनाचा दबाव वाढतो आणि फिस्कल डेफिसिटमध्ये तीव्र स्वरूपाचा चढ होतो. भारताची अर्थव्यवस्था अगोदरच टाईट मार्जिन्समधून हेलकावे खात आहे. तिला हा मोठा फटका बसेल. तेलाशिवाय भारताची डावपेचात्मक भूराजकीय स्थितीशी तडजोड केली जाईल. इराणचे चाबाहर बंदर जे भारताने विकसित केले आहे आणि ते पाकिस्तानला उत्तर म्हणून काम करत आहे ते या युद्धात एक तर बंद होईल किंवा काम करणे सोडून दिले जाईल आणि त्याबरोबरच भारताकडे असलेला एकमेव उपलब्ध दक्षिण उत्तर मार्ग म्हणजे मध्य आशिया आणि रशिया यांच्याकडे जाण्याचा व्यापारी मार्गही बंद होईल. हे नुकसान प्रचंड असेल. कारण हा मार्ग पाकिस्तान आणि चीनमधून जातो. शिवाय यामुळे काश्मीर आणि त्या पलीकडे दहशतवादाचा धोकाही अतोनात वाढेल. हा सर्व विचार करता भारताने इराण किंवा इस्त्रायल यांपैकी कुणाचीही बाजू न घेताच युद्ध टाळण्यासाठी प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे. राजनैतिकदृष्ट्याही याचे तोटे अनेक आहेत. कारण भारताने जर इराणची बाजू घेतली, तर इराणसारखा मित्र देश गमावेल आणि त्याचा फटका भारताला बसेल. कारण इराण हा भारताचा इंटलिजन्स शेअरिंगमध्ये अत्यंत महत्त्वाचा भागीदार आहे. तो लाभ भारताला गमवावा लागेल. या सर्व तोट्याबरोबरच भारताला एक फार मोठ्या शत्रूला तोंड द्यावे लागणार आहे. ते म्हणजे चीनचा या प्रदेशात शिरकाव होईल. चीनच्या इराणीयन डावपेचात्मक ठिकाणांमध्ये प्रवेश केल्याने पाकिस्तानला सहज प्रवेश मिळू शकेल आणि पाकच्या गुप्तचर संस्थांची क्षमता या भारताच्या धोकादायकरीत्या जवळ आहे आणि त्यामुळे भारतासाठी इराणचे कोसळणे हे एखाद्या देशाचे कोसळणे नसेल, तर पाश्चिमात्य प्रदेशाकडे जाणारा रस्ताच बंद होईल. इराण जर या युद्धात पराभूत झाला, तर भारतालाही मोठा फटका बसेल कारण भारताच्या परराष्ट्र धोरणाचा गेली अनेक दशके जे भारताचे परदेशी धोरण ठरवत आहे आणि भारताचा झेंडा उंच ठेवत आहे तेच कोसळेल. सध्याच्या इराण-इस्त्रायल संघर्षामुळे अनेक प्रश्न भारतासमोर निर्माण होणार आहेत. जरी भारत इराणकडून थेट पेट्रोल आयात करत नाही तरीही भारताच्या क्रूड तेलाच्या किमतींचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे कारण जागतिक तेलाच्या किमती आज अर्थव्यवस्था ठरवतात. शिवाय २० टक्के तेल हे होर्मुझच्या खाडीतून येते. त्यामुळे तेथे युद्ध झाले, तर होर्मुझचा रस्ता बंद होऊन भारताला तेल केप ऑफ गुड हापला वळसा घालून आयात करावे लागेल, त्यामुळे आयात तेलाची किंमत किती वाढेल याची कल्पना येण्यासारखी आहे. या क्षेत्रात व्यत्यय आला, तर त्याचा परिणाम भारताच्या निर्यातीवर होणार आहे. अगोदरच भारताची निर्यात कमी आहे. त्यात हा खर्च वाढला तर भारताची अर्थव्यवस्था बसू शकते. त्यामुळे भारतासमोर सध्या एकच पर्याय आहे तो म्हणजे इराण आणि इस्त्रायल या दोन्ही देशांनी युद्ध थांबवावे यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. या युद्धात कुणा एकाची बाजू घेतली, तर भारताला त्याची फार मोठी किंमत मोजावी लागेल.

# परिवर्तनाच्या लढ्याचा शिलेदार



भाकरीच्या संघर्षात ज्याचं हरवलेलं बालपण आहे.भुकेनं व्याकुळल्या मनाची ज्यात तगमग आहे, जात नावाच्या उतरंडीच्या ठेवणीत अपमानित झालेलं,गुदमरून गेलेलं ज्याचं बालमन आहे. लादलेल्या गुलामगिरीची ज्याला चीड आहे, ज्याच्या डोळ्यात जातीयतेच्या नावाखाली नागवलेल्या जीवाची जळजळ आहे.सारे दुःख,साऱ्या वेदना उघड्या डोळ्यांनी पाहणाऱ्या नजरेची कळकळ आहे.जात समाज,वंचितांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात ज्यांनं पोलिसांच्या लाट्याकाट्या खात सरकारला जाब विचारला आहे. शेकडो गुन्ह्याचे अलंकार अंगावर चढवत परिवर्तनाच्या लढ्याचा शिलेदार ठरलेला जो पँथर आहे. समाजासाठी तडीपार झाल्याने स्वताचा पोटचा मुलगा औषधामुळे गमावल्याचं दुःख हृदयात दडपणारा तो. अंतिम संस्कारास उपस्थित राहण्यासाठी पोलिसी ससेमिऱ्यास चुकवून मुलाला स्मशानात स्वताच्या हाताने दफण करणारा तो जबाबदार हा बाप आहे.दरम्यान पोलिसांना गुंगारा देऊन जिल्ह्या बाहेर पडणारा निधड्या छातीचा हा वीर आंबेडकरी समुदायास प्रेरणादायी ठरनारा मार्गदाता आहे.ज्याचा उद्देश प्रस्थापित रूढीचे दास्य झुगारून द्यायचा आहे.गरीब, दबलेल्या,पिंजलेल्या दलित वंचित पीडित बहुजन माणूस ज्याला न्याय,स्वातंत्र्य,समता,बंधुभाव मिळवून द्यायचा आहे.हीच ज्याची साडेतीन दशकातली वाटचाल आहे.ज्याचे आदर्श बुद्ध शिव फुले शाहू आंबेडकर आहेत.जो बहुजनांचा नायक ठरला आहे. त्याच्या जगण्यातली भीषण वास्तवता कोणाला नाकारता येईल का?आपल्या अनुभवांना जळजळीत शब्दात बांधित अन्यायी जुलमी प्रस्थापितांविरुद्ध आवाज उठवणारं नाव म्हणजे बाबुराव पोटभरे!विषमतावादी व्यवस्थेच्या भट्टीतून ताऊन सुलावून निघालेला धगधगता निखारा म्हणून आज महाराष्ट्रभर परिचित आहे. मोहा गावापासून माणसाच्या दास्य मुक्तीसाठी घोंगावणाऱ्या वादळाचा लंडन अमेरिका फ्रांससह ४२ देशात पोहोचलेला थरारक प्रवास थक्क करणारा आहे. बीड़ जिल्ह्यातील माजलगाय मतदार संघातील मोहा या गावी दलित शेतमजूर कुटूंबात बाबूराव पोटभरे यांचा जन्म झाला. आई वडिलांना बाबुराव पोटभरे यांच्यासह सात आपत्य.राहण्यास निवारा नाही,पोटात अन्न नाही, गावकीची काम करत उदरनिर्वाह करावा लागायचा.गाव कम्युनिस्ट पक्षाचा बालेकिल्ला असले तरी जात चौकट याठिकाणी आपला पगडा मजबूत ठेवून होती. सार्वजनिक विहिरींवर पाणी पिण्यास मज्ञाव.सार्वजनिक ठिकाणी संचार नाही. सर्वत्र वरच्या जातीची दडपशाही.अशा अपमानित नाकारलेल्या व्यवस्थेच्या चक्रात त्याचं बालपण चिरडल्या गेलंल. कुजलेल्या सडलेल्या परिस्थितीतच स्वतःतला बंडखोर त्यांनी शाळकरी वयातच शोधून काढला.माझ्याच वाट्याला हे जिनं का?माझ्याच समाजाबाबत अशी अपमानित व्यवस्था का?मी ही व्यवस्था बदलणार.मी हे जीनं नाकारनार.हा प्रण करत त्यांनी बालवयातच गावकीचे काम करण्यास इन्कार केला.घरात समाजातही ते आग्रही राहिले. किशोरवयीन अवस्थेतच आंबेडकरी चळवळीशी नाळ बांधत त्यांनी आपल्या जीवनाची दिशा निश्चित केली.जसं जसं शिक्षण वाढत गेलं, तसं तसं हे वाघनीच दुध त्यांना गुरगुर करण्यास प्रोत्साहित करू लागलं.पुढं पुढं डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा हा पँथर अन्याय विरोधात जिल्हाभर डरकाळ्या फोडू लागला.नामांतर आंदोलनाचा काळ त्यांचा झंजावती ठरू लागला.बाबुराव पोटभरे हे नाव सामाजिक,राजकीय क्षितिजावर ठसठशीत दिसू लागलं. महाविद्यालयीन जीवनाच्या सुरुवातीलाच त्यांची आंदोलन पोलिसांच्या रडारवर येऊ लागली. वयाच्या अवघ्या १७ १८ व्या वर्षी १९८४ साली अंबाजोगाईत झालेल्या ५७ च्या अखिल भारतीय साहित्य संमेलनामध्ये नामांतरचा ठराव घेण्यात यावा,या गागणीसाठी आंदोलन केले.जे बाबुराव पोटभरे यांचा सामाजिक दरारा निर्माण करण्यास कारणीभूत ठरलं. जिल्ह्यात जे आंदोलने व्हायची त्याचे अनेक आरोप त्यांच्यावर टाकण्यात येऊ लागले.जातीवादी मानसिकता असणाऱ्या प्रस्थापित राजकारन्यासाठी ते कर्दनकाळ ठरु लागले.दरम्यान १९८७ ते ८९ या तीन वर्षाकरीता बाबुराव पोटभरे यांना मराठवाड्यातून तडीपार करण्यात आले होते. १९९२ ला माजलगाव तालुक्यातील गंगामसला जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवून ते विजयी झाले.बीड जि.प. समाजकल्याण सभापती म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली.या संधीचे सोने करीत त्यांनी समाजकल्याण सभापती पदाची ओळख जिल्ह्यासह मराठवाड्याला त्यांनी कर्तृत्वातून करून दाखविली.आजपर्यंतच्या कारकिर्दीमध्ये राजकीय आंदोलना व्यतिरिक्त एकही गुन्हा त्यांच्यावर दाखल नाही.मोर्चे,आंदोलनाच्या माध्यमातून अनेकांना त्यांनी न्याय मिळवून दिला आहे.गायरान हक्काचा लढा त्यांचा कौतुकास पात्र आहे.यामुळे अनेकांना हक्काची ज मिळाली आहे. घरकुल,रमाई अ ास योजना, दलित वस्ती स् योजना सामान्यांपर्यंत पोहोचविण्या ठी ते नेहमी आग्रही असतात.समाज प्रश्नाकरीता मोर्च आंदोलन करत त अनेक प्रश्न मार्गी लावण्यात यश मिळ आहे.त्याचबरोबर सर्व समाजाभि नेतृत्व म्हणूनही त्यांनी आपली वे ओळख शिवजयंती,गणेशोत्सव व र महापुरुषांच्या जयंत्याच्या माध्यम करून दिली आहे. फक्त जातीच नाही,तर सर्वच जाती धर्माच्या दी बळ्या व वंचित घटकांच्या मदत धावून येणारा नेता म्हणून आज त्यांची ओळख निर्माण झाली आहे. बहुजनांचा दलितांचा हिरो म्हणून महाराष्ट्रात कोठेही दलित, बहुजनांवर अन्याय झाला तर सगळ्यात आधी पोटभरे हे तेथे पोहचलेले असतात,मराठा समाजाच्या आरक्षण लढयात ही त्यांची भूमिका मराठा युवकांसाठी आकर्षक राहिली.राजकारणा पेक्षा समाजकारणावर त्यांचा भर आहे. अल्पावधीतच सर्वधर्मीय तरुणांच्या गळ्यातील ताईत बनताना अतिशय संघर्षातून त्यांनी ही गरुडझेप घेतली आहे.आज सर्वच गरीब वंचित बहुजन समाजाचे ते नायक आहेत.त्यांचा संघर्षमय प्रवास इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. सर्वसाधारण दलित कुटुंबात जन्मलेला तरुण राजकीय, सामाजिक क्षेत्रात मोठी उंची गाठू शकतो हे पोटभरे यांच्याकडे पाहिल्यावरच कळते. गरजू पिढीत दुखीतांसाठी २४ तास त्यांच्या घराचा दरवाजा खुला असतो. लांबून लांबून लोक त्यांच्याकडे आपल्या समस्या घेऊन येतात. सतत सामान्य लोक कार्यकर्ते त्यांच्या भेटीला आलेले असतात.त्यात सर्व जाती-धर्माच्या युवकांचा समावेश असतो. कुठलेही सत्तेतले मोठे राजकीय पद नाही.संस्था नाही, मुबलक बेमालूम पैसा नाही.तरीही हक्काचा आधार म्हणून लोकांच्या, कार्यकर्त्यांच्या,तरुणांच्या नजरेत त्यांची इमेज तयार झाली आहे. यासाठी रक्ताळलेल्या पाऊलवाटून त्यांना जावे लागले आहे.मोठा संघर्ष करावा लागला आहे. असा माणसाच्या दास्यमुक्तीसाठी घोंगावणाऱ्या वादळरुपी बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांचा साडेतीन दशकातील लंडन अमेरिका फ्रांसह ४२ देशात पोहोचलेला थरारक प्रवास थक्क करणारा आहे.

बहुजनांचा आधारवड सामाजिक परिवर्तनाच्या लढाईतील आघाडीचा विद्रोही सैनिक म्हणून बाबूराच पोटभरे यांना ओळखले जाते.बहुजन विकास मोर्चाच्या माध्यमातून पिखुरलेल्या बहुजनांना एका ध्वाखाली आणण्यासाठी ते धडपडत असतात.अन्याय, अत्याचाराविरुध्द मूठ आवळून संघर्ष करण्याची शिकवण त्यांच्या कार्यकर्तृत्वातून मिळते. जाती व्यवस्थेचे चटके त्यांनी स्वतः भोगले,त्यामुळे याविरुद्ध आवाज उठवत ने अनेकांचे आधार बनले आहेत.आंतरजातीय विवाह, गायरान हक्क लढा,विद्यापीठ नामांतर चळवळ यात बाबूराव पोटभरे यांचा मोलाचा वाटा राहिलेला आहे.जिल्ह्याच्या सामाजिक,राजकीय पटलापर पोटभरे या नावाने वलय निर्माण केले आहे.पोटभरे यांनी अनेकाना स्वाभिमान व अस्तित्याची शिकवण करून दिलेली आहे.

## बीड जिल्ह्याचा राजकीय किंगमेकर

समाजकारणात प्रचंड वलय असल्याने जिल्ह्याच्या राजकीय पटलावर ही बाबुराव पोटभरे यांचा दबदबा आहे.निवडणुकीच्या राजकारणात त्यांची भूमिका निर्णायक ठरत आहे.पोटभरे यांचा हात ज्या उमेदवारावर तोच उमेदवार आमदार,खासदार, नगराध्यक्ष,सभापती,अध्यक्ष, सरपंच,होऊ शकतो हे जिल्ह्यातील चित्र आहे. हाच करिष्मा ते आजूबाजूला इतर दोन-तीन जिल्ह्यात ही दाखवू शकतात हे वास्तव आहे.त्यामुळेच त्यांच्या शाक्य निवासस्थानी निवडणुकी दरम्यान उमेदवारांची रीग लागलेली असते.म्हणूनच बीड जिल्ह्याच्या राजकारणातील ते किंगमेकर असल्याचे सिद्ध झालेले आहे.

## जाति अंतासाठी अनेक...

जाती अंतासाठी बाबुराव पोटभरे यांना अनेक प्रस्थापित जातीवाद्यां विरोधात दुश्मनी घ्यावी लागली आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा हा पँथर जिथे अन्याय करणारी औलाद आहे त्याच्याविरुद्ध डरकाळी फोडताना दिसत होता. हा स्वाभिमान हा निडरपणा अनेक जातीयवाद्यांना खटकत होतात.त्यामुळे बाबुराव पोटभरे यांच्यावर अनेक ठिकाणी जीव घेणे हल्ले करून त्यांना भयभीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला.स्वाभिमानी चळवळीसाठी अनेक प्रसंग त्यांच्या जीवावर बेतले.परंतु जांबाज तरुण मागे नाही हटला. पुढे बाबुराव पोटभरे यांची स्टाईल जिल्ह्यात आंबेडकरी तरुणांना प्रेरणादायी ठरली.

## दातृत्व जोपासणारा मदतगार...

सकाळी १० ते रात्री १० पर्यंत बाबुराव पोटभरे यांच्या शाक्य निवासस्थानी जनता दरबार भरलेला असतो.यादरम्यान दूर दुरचे लोक त्यांच्याकडे आपल्या तक्रारी समस्या अडचण घेऊन येतात. कोणाला मुलाबाळाच्या लग्नासाठी आर्थिक सहकार्य अपेक्षित असते. तर कोणाला दवाखान्याच्या कामासाठी मदत हवी असते.कोणी शिक्षणाच्या कामासाठी त्यांच्याकडे मदतीची अपेक्षा करतो.तर कोणी सेवाभावी संस्थेला मदत मिळवण्यासाठी त्यांच्या दरबारात आलेला असतो.त्या प्रत्येकाला ते सढळ हाताने मदत करतात. बाबुराव पोटभरे यांना कुठलंही सत्तेतलं मोठं राजकीय पद नाही.संस्था नाही,मुबलक पैसा पुरवणारी कुठलही साधन नाही.साधी पिठाची गिरणीही नाही.परंतु स्वतः दुःख दारिद्र्य गरिबी भोगून आलेले बाबुराव पोटभरे आपल्या परीने लोकांना मदत करत आहेत म्हणूनच ते निराधारांचे आधार मदतगार आहेत.दातृत्व जोपासणारा नेता म्हणून परिसरात परिचित आहेत.

## नाकारल्यामुळे...

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून सामाजिक चळवळीसाठी बाबुराव पोटभरे यांनी आपले जीवन वाहिले आहे.गेल्या पस्तीस वर्षात समाजकारण राजकारण करताना सत्तेचा मार्ग सोपा करण्याच्या अनेक संधी त्यांच्यासमोर आल्या होत्या. परंतु यासाठी त्यांना आंबेडकरी चळवळीची बेईमानी करावी अशी अट प्रस्थापितांकडून लादण्यात आली होती.ही अट त्यांनी स्वीकारली असती तर सुरुवातीच्या काळातच ते आमदार झाले असते. या आंबेडकरी योद्धाने चळवळी सोबत गद्दारी करण्यास ठाम नकार दिला.ज्याचा परिणाम बाबुराव पोटभरे गेल्या ३५ वर्षापासून आमदारकी पासून दूर राहिले आहेत.

## मुंडे यांनी मला हेरलं होत...

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा लोकनेते गोपीनाथराव मुंढे यांच्या सोबत असलेली माझी निखळ मैत्री राज्यभर सर्वश्रुत होती.१९८७ ला मुंडे यांनी मला हेरलं होत.एकदा मला बोलावूनफ्तू लड मी,तुझ्या पाठिशी आहेफ्असे गोपीनाथराव म्हणाल्याचे पोटभरे वारंवार सांगतात.केशरबाई क्षीरसागर, गोपीनाथराव मुंडे,राधाकृष्ण पाटील व शिवाजीराव पंडित यांच्याकडून खूप शिकावयास मिळाले,शरद पवार,उद्धव ठाकरे,प्रकाश आंबेडकर,रामदास कदम, रामदास आठवले धनंजय मुंडे,उषाताई दराडे यांच्यासोबत देखील माझे कौटुंबिक संबंध असल्याचे पोटभरे आवर्जून सांगतात.बाबूराव पोटभरे यांनी अमेरिका,फ्रान्स,इंग्लंडसह ४२ देशांत वेगवेगळ्या परिषदेसाठी प्रवास करून उपस्थिती देखील लावलेली आहे.पोटभरे यांना आतापर्यंत दिल्ली पोलीस फाउंडेशनच्या वतीने समता पुरस्कार,अखिल भारतीय दलित अकॅडमी दिल्ली,कल्पना सरोज फाउंडेशन अमेरिकेचा संयुक्त राष्ट्रसंघ वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकररत्न पुरस्कार,संघ काया फाउंडेशन गुजरात यांचा आउटस्टैंडिंग बुद्धिष्ट पुरस्कार ब्रिटिश पार्लमेंटमध्ये अंतरराष्ट्रीय सामाजिक एकता पुरस्कार यासह अनेक छोटे-मोठे पुरस्कार मिळाले आहेत.

पान सहा वरुन

### आरोग्यासाठी नियमित

पाटील अनिल गोंडे पंढरीनाथ जोशी कमलाकर देशमुख सह भाजपाचे व शहरातील विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करताना पात्रुड मंडळाचे अध्यक्ष डॉ अभिजीत सोळंके म्हणाले या शिबिरासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल व चांगली व्यवस्था उपलब्ध करून दिल्याबद्दल निखिल वाघमारे यांचे आभार व्यक्त करत या कार्यक्रमासाठी भाजपाचे सर्व पदाधिकारी सदस्य व शहरातील नागरिक उपस्थित राहिले त्याबद्दल आभार मानले.

### गरिबीतून प्रगतीकड

शहेज़द रफिक कुरेशी,जकवान कुरेशी, व छड्डणख विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मो. आकिब तौफिक कुरेशी. यांची प्रमुख उपस्थिती होती. इस्लाम धर्मात उमरा ही अत्यंत पुण्यप्रद यात्रा मानली जाते. जरी ती हजसारखी फर्ज नसली, तरी हृदयशुद्धी, नम्रता आणि अल्लाहच्या नजिक जाण्याचा तो एक पवित्र मार्ग आहे. मक्का व मदिनातील दर्शन, काबा शरीफची तवाफ, जमजम पाणी, सफा-मरवा यामधून मुसलमान भाविक आपले अंतःकरण शुद्ध करतात आणि दुवांची मागणी करतात. अल्लाहकडून क्षमा आणि बरकत मिळवण्याची ही एक सुवर्णसंधी मानली जाते. शेख मोहम्मद यांच्या संघर्षमय जीवनाचा गौरव* शेख मोहम्मद यांचे जीवन म्हणजे गरिबीवर मात करत स्वाभिमानाने जगण्याचा आदर्श. त्यांनी कधीही परिस्थितीसमोर हार मानली नाही. आज ते आणि त्यांचे कुटुंब उमरा यात्रेला निघाले आहेत, ही त्यांच्यासाठीच नव्हे, तर लोणारसारख्या छोट्या शहरातील युवकांसाठीही प्रेरणादायी घटना आहे. अल्लाह त्यांच्या यात्रेला कुबूल करो, आणि त्यांच्यावर आपली रहमत कायम ठेवो, अशा शुभेच्छांनी त्यांना निरोप देण्यात आला.

### लाडक्या बहिणींना

सरकारने योजना जाहीर केल्यानंतर तिची तातडीने व प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करत शिंदे म्हणाल्या, महिलांच्या आशा-अपेक्षांशी खेळ खेळू नये. अन्यथा सावता सेना महिला आघाडी रस्त्यावर उतरून सरकारला जागं करेल,असा इशारा त्यांनी दिला.

### ...अन्यथा अर्धनग्न

कारवाई केली आहे. म्हणून तलाठी यांनी मा. तहसिलदार यांच्या कडून सूचना दि. ३०/१२/२०२२ रोजी प्राप्त होण्यापुर्वी २२/१२/२०२२ रोजी मनमानी पध्दतीने फेरफार कर. ११५८५ नोंदविलेला आहे. सदर फेरफार नोंदविताना संबंधितांना कुठलीही नोटीस देण्यात आलेली नाही. सदर फेरफार ११५८५ नोंदविताना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४८,१४९ व १५० प्रमाणे कोणतीही कारवाई केलेली नाही. मा. तलाठी यांनी उपरोक्त कारवाई करुन भारतीय संविधानाचा मला प्रदान केलेल्या मुलभूत अधिकार अनुच्छेद १४,१५,१६,१९, व २१ चे हानन झाले आहे. फेरफार क्र. ११५८५ दि.२२/१२/२०२२ रोजी घेण्यात आला.फेर घेऊ नये म्हणून २८/१२/२०२२ ला आक्षेप नोंदवला होता, परंतु त्यांनी कसलीही दखल न घेता सदर मुदतीच्या आत बेकायदेशीर पणे ४ जानेवारी २०२३ रोजी फेरफार मंजूर करण्यात आला. या करिता आपणास मा. तलाठी व मंडळ अधिकारी श्री. नवनाथ देवराव औंदकर व मंडळ अधिकारी घोडके मॅडम यांच्या विरुध्द फौजदारी खटला दाखल करण्या करिता रीतसर परवानगी द्यावी हि नम्र विनंती. नसता दि.०४/०७/२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर अर्जदार व इतर बाधित शेतकरी अर्धनग्न आंदोलन केले जाईल,यानंतर होणाऱ्या परिणामाची जबाबदारी आपल्या कार्यालयावर राहील.अशी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना देण्यात आली आहे. व मंडळ अधिकारी व तलाठी यांची सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास कारवाई करण्यात यावी?

### पेरणीच्या तोंडावर

कायदेशीर लिलावातुन ऊसाची थकीत रक्कम द्यावी या मागणीसाठी २४ जुन रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने हलगी बजावो आंदोलन करण्यात येणार आहे तरी ऊसाचे पैसे थकीत असणार्या शेतकरी बांधवांनी शेकडो च्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शेतकरी नेते भाई ड. नारायण गोले पाटील यांनी केले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## विवेक विद्यालयात योग दिन उत्साहात

**मुंबई :** विवेक विद्यालय, विक्रोळी पार्कसाईट या शाळेत २१ जून २०२५ रोजी 'जागतिक योग दिन' स्वास्थ्यपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. योग हा प्राचीन भारतीय परंपरा आणि भारतीय संस्कृतीची एक अमूल्य अशी जगाला दिलेली देणगी आहे. म्हणुनच यावर्षी आंतरराष्ट्रीय जागतिक योग दिवस विद्यार्थी व शिक्षकांनी सामूहकरीत्या साजरा केला. यावेळी सर्व विध्यार्थ्यांना जागतिक योग दिवसाचे महत्त्व तसेच योग्यशास्त्र ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे, तसेच योगासनांचे आरोग्याचे दृष्टीने किती महत्त्व आहे हे शाळेचे मुख्याध्यापक श्री विवेक थोरात सर यांनी स्पष्ट केले. क्रीडा शिक्षक, फडतरे सर व इतर सहकारी शिक्षकांनी विविध योगासने, सूर्यनमस्कार यांचे प्रात्यक्षिक करून दाखविले व विध्यार्थ्यांनी अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात आसने केली. जागतिक योग दिवसाच्या कार्यक्रमाला संस्थेच्या संचालिका मनीषा थोरात उपस्थित होत्या. अशा प्रकारे अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात ' जागतिक योग दिवस' विवेक विद्यालयात साजरा झाला.

# मुंबईचे अतिरिक्त आयुक्त अजूनही ठाण्यातील एमआयडीसीच्या निवासस्थानातच

### ठाण्यातील घरांच्या भाड्यापोटी उचलावा लागतो महापालिकेला खर्च

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

मुंबई महापालिकेत अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्त झालेले डॉ. विपीन शर्मा यांनी ठाण्यातील निवासस्थानाचा अधिकार सोडलेला नसून या निवासस्थानाचे भाडे आता महापालिकेला अदा करावे लागत आहे. शर्मा राहत असलेल्या बंगल्याचे मासिक भाडे सुमारे २ लाख रुपये एवढे असून मलबार हिल आणि महापालिकेचे भायखळा राणीबागेतील पूर्वीचा उद्यान अधिक्षक आणि आता नुतनीकरणानंतर अतिरिक्त आयुक्त यांच्या निवासासाठी वापरण्यात येणारे बंगले रिकामे असूनही महापालिकेला अतिरिक्त आयुक्तांच्या ठाण्यातील निवासस्थानासाठी प्रति माह सुमारे २ लाख रुपये खर्च करावा लागत आहे.

अतिरिक्त आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांची मुंबई महापालिकेत बदली होण्यापूर्वी ठाणे (प) येथील मानपाडा, निलकंठ बुड येथील बंगला क्र. १६ येथे निवासाला होता. हे निवासस्थान महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अर्थात एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर कार्यरत असताना शर्मा यांना वितरीत झाले होते. एमआयडीसीने सीईओ पदासाठी ठाण्यातील मानपाडा निलकंठ बूडमधील बंगला क्रमांक १६ भाडेतत्वावर घेतला होता; परंतु शर्मा यांची मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पदी बदली झाल्यानंतर याच निवासस्थानी राहणे पसंत केले आणि एमआयडीसीने भाडेतत्वावर घेतलेल्या या बंगल्याचे भाडे मुंबई महापालिकेला अदा करण्याची विनंती केली. त्यानुसार महापालिका प्रशासनाने प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर पहिल्या घरमालकाबरोबर महानगरपालिका ज्या दिनांकापासून नवीन कंत्राट करील त्या ३१ ऑगस्ट २०२४ पासून ते ३१ मार्च २०२५ पर्यंतच्या कालावधीकरिता १२ लाख २४ हजार ५२८ एवढ्या रकमेचे; आणि १ एप्रिल २०२५ पासून पुढील कालावधीसाठी घरभाड्यापोटी येणाऱ्या खर्चाला मान्यता दिली आहे. या घरभाडयापोटी येणाऱ्या खर्चाच्या रकमेत मालमत्ता कर, दूरध्वनी देयके, गॅस जोडणी आकार व देयके, विद्युत देयके, पाणीपुरवठा देयके, सुरक्षा व्यवस्था, दुरुस्तीची कामे, वार्षिक देखभाल व दुरुस्तीच्या कराराची कामे आणि इतर संबंधित शुल्क आदी रक्कम देण्यात येत आहे. त्यामुळे मासिक दोन लाख रुपयांपेक्षा अधिक घरभाडे ठाण्यातील निवासस्थानासाठी मोजावे लागत आहे.




#### सेवा निवासस्थाने रिक्त

मुंबई आयुक्तांसह चार अतिरिक्त आयुक्तांसाठी सेवा निवासस्थाने उपलब्ध असून सध्या डॉ. अमित सैनी आणि डॉ. अश्विनी जोशी यांची निवासस्थाने मुंबईत असल्याने महापालिकेच्या सेवा निवासस्थानांचा वापर होत नाही, तर मलबार हिल आणि भायखळा राणीबाग येथील अतिरिक्त आयुक्तांसाठी असलेले सेवा निवासस्थाने रिक्त आहेत. मात्र, ही सेवा निवासस्थाने रिक्त ठेवून ठाण्यातील सेवा निवासस्थानासाठी मासिक दोन लाखांचा होणारा खर्च महापालिकेच्या तिजोरीवर परिणाम करणारा ठरणार आहे.

### याचिकाकर्त्यांना कायमस्वरूपी घरे दिली जाणार

## उरणमधील जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांची उच्च न्यायालयात धाव



◆ मुंबई (प्रतिनिधी) :

पुनर्वसनाच्या खोट्या आश्वासनांमुळे गेल्या ४० वर्षांपासून संक्रमण शिबिरात राहावे लागत असल्याचा आरोप करून उरण तालुक्यातील शेवा कोळीवाडास्थित जवाहरलाल नेहरू बंदर (जेएनपीटी) प्रकल्पग्रस्तांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तसेच, जेएनपीटी प्रकल्पासाठी ४० वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या भूसंपादनामुळे विस्थापित झालेल्या २५६ कुटुंबांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने योग्य आदेश देण्याची मागणी केली आहे. या प्रकल्पग्रस्तांनी महाराष्ट्र लघुस्तरीय पारंपरिक मत्स्य कामगार संघाच्या वतीने जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए), बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालय, कोकण विभागाचे विभागीय आयुक्त, रायगड जिल्हाधिकारी आणि सिडको यांच्याविरोधात ही याचिका केली आहे. तसेच, जेएनपीए महाराष्ट्र प्रकल्प प्रभावित व्यक्ती पुनर्वसन कायद्यांतर्गत आपल्या वैधानिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात पूर्णपणे अपयशी ठरल्याचा दावा केला आहे.

याचिकेत २४ जानेवारी रोजी मंजूर झालेल्या पुनर्वसन योजनेची कालबद्ध अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यात, १०.१६ हेक्टर जमीन वाटप, अंतरिम मदत, दीर्घकाळ विस्थापनासाठीची भरपाई आणि अंमलबजावणी प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी न्यायालय नियुक्त समिती स्थापन करण्याचा समावेश आहे. पुनर्वसनाच्या दीर्घ प्रतीक्षेमुळे ४० वर्षांपासून संक्रमण शिबिरात राहावे लागत असलेल्या याचिकाकर्त्यांच्या संघर्षाचे वृत्त एका इंग्रजी वृत्तपत्राने गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये प्रसिद्ध केले होते. पुनर्वसन केले जात नसल्याच्या कारणास्तव या समुदायाने निवडणुकांवर बहिष्कार टाकल्याचे वृत्तही प्रसिद्धीमाध्यमांनी प्रसिद्ध केले होते. केंद्रीय निवडणूक आयोगाने त्याची दखल घेऊन रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकाऱ्यांसह प्रकल्पग्रस्तांची भेट घेतली होती. तसेच, त्यांच्या मागण्या उच्च अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर, १९ डिसेंबर २०२४ रोजी केंद्र सरकारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने याचिकाकर्त्यांना लवकरच कायमस्वरूपी घरे दिली जातील, असे तोडी आश्वासन दिले होते.

#### याचिकेत सुधारणा करण्याची मागणी

या त्रासाची भरपाई म्हणून प्रत्येक कुटुंबाला ५० लाख रुपयांची भरपाई देण्याची मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे. प्रकल्पग्रस्त कुटुंबांसाठी स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता, मलनिस्सारण वाहिन्या, कायमस्वरूपी वीज पुरवठा आणि इतर आवश्यक सेवांची तरतूद यासह विद्यमान संक्रमण शिबिरातील सुविधांमध्ये तातडीने सुधारणा करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

## वेचक

### पालिका कार्यालयातही योग दिवस साजरा

**मुंबई :** जागतिक योग दिनाचे औचित्य साधून आज एन वॉर्ड महानगर पालिकेच्या सभागृहात पालिका अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक यांनी सामूहिकरीत्या योग दिवस साजरा केला. उपआयुक्त संजय कुमार धोंडे,



सहायक आयुक्त गजानन बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आज योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी योगाचे विविध आसने योगा शिक्षकाच्या माध्यमातून करण्यात आले. शरीरातील आळस, थकवा , फ्रेशपणा आणण्यासाठी दररोज योगा खूप महत्त्वाचा असल्याचे यावेळी मार्गदर्शन योगा शिक्षिका प्रीती कदम व त्याच्या सहकाऱ्यांनी प्रात्यक्षिक दाखवत मार्गदर्शन केले. यावेळी एन वॉर्ड पालिकेतील विविध खात्यातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने आयोजित करण्यात आलेल्या योगाला सहभागी होते. यावेळी सहायक अभियंता आनंद पांचाळ, ज्ञानेश्वर उकिरडे, घन कचरा व्यवस्थपनचे सहायक अभियंता किरणसिंग पाटील , वैद्यकीय अधिकारी रवींद्र हांगे, तक्रार निवारण अधिकारी वैशाली निकुंभ आदी उपस्थित होते.

### घाटकोपर पोलीस ठाण्यात सामूहिक योग दिन

**मुंबई :** जागतिक योगा दिवसानिमित्त घाटकोपर पोलीस ठाण्यात योगा दिन साजरा करण्यात आला. पोलीस उपायुक्त राकेश ओला, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बळवंत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली योग दिन



साजरा करण्यात आला. सकाळी ७ ते ९ दरम्यान आयोजित या सामूहिक योगाला घाटकोपर पोलीस ठाण्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सामूहिक योगाला योग शिक्षिका स्वाती सावंत यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी योगाला वरिष्ठ पोलीस निरीक्षक बळवंत देशमुख यांच्या सह पोलीस निरीक्षक नालंदा लांडगे, पोलीस उपनिरीक्षक नम्रता डोंगरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गवळी, पो. ह पिसाळ, पो. ह गुंडे, पो. शि चव्हाण , पो. शी राठोड, पो. शि बडगुजर, पो. ह चिकने , म.पो. शि कुरने , पो. शि मांढरे व इतर अंमलदार यांनी सहभाग नोंदवून विविध प्रकारचे आसने व योगासने करण्यात आली.

### १६९ देशांमधील लोकांचा एकत्र योग विक्रम

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करत हॅबिल्ड या भारतातील पहिल्या हॅबिट-बिल्डिंग प्लॅटफॉर्मने उल्लेखनीय जागतिक टप्पा गाठला आहे, जेथे 'जागतिक स्तरावर ऑनलाइन योग क्लासमध्ये सर्वाधिक उपस्थिती' शीर्षकासाठी नवीन जागतिक विक्रम रचला आहे. २१ जून रोजी सकाळी अधिकृत वर्ल्ड रेकॉर्डच्या अध्यक्षतेखाली हॅबिल्डचे सौरभ बोथरा यांनी आयोजित केलेल्या समक्रमित, मार्गदर्शित सत्रात १६९ देशांमधील ७,५२,०७४ पेक्षा जास्त सहभागी व्हर्च्युअल पद्धतीने योगा करण्यासाठी एकत्र आले. नागपूरहून लाइव्ह स्ट्रिमिंग करण्यासह जगभरात उपलब्ध करून देण्यात आलेल्या या ४५ मिनिटांच्या सत्रात १०० हून अधिक देशांतील योगसाधक एकत्र आले, ज्यामुळे हा सर्वात सर्वसमावेशक व दूरगामी योग इव्हेण्ट ठरला. हा हॅबिल्डचा आतापर्यंतचा पाचवा जागतिक विक्रम आहे.

### रेल्वेचा योग दिनानिमित्त देशव्यापी कार्यक्रम

**नई दिल्ली :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, भारतीय रेल्वेने देशभरात भव्य आणि उत्साही योग सत्रांचे आयोजन केले. 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' या भावनेला देशातील सर्व रेल्वे झोन, विभाग, स्थानके आणि रेल्वे परिसरांमध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी, रेल्वे राज्यमंत्री व्ही. सोमन्ना यांनी कर्नाटकातील हसन येथे योग सत्रात भाग घेतला आणि रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंह बिट्टू यांनी चंदीगडमधील सुखना तलावाच्या काठावर योग सत्रात भाग घेतला. रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश कुमार यांनी नवी दिल्लीतील कर्नेल सिंग स्टेडियममध्ये आयोजित केलेल्या योग सत्रात भाग घेतला. पहिल्यांदाच, जम्मू आणि काश्मीरमधील चिनाब नदीवर स्थित जगातील सर्वात उंच रेल्वे आर्च ब्रिज असलेल्या चिनाब ब्रिजवर एक विशेष योग सत्र देखील आयोजित करण्यात आले. यासोबतच योग आणि अभियांत्रिकीच्या अद्भूत संयोगाचे प्रतीक बनलेल्या भारतातील पहिला केबल स्टेड रेल्वे ब्रिज अंजी ब्रिज आणि तामिळनाडूमध्ये बांधलेला देशातील पहिला वर्टिकल लिफ्ट रेल्वे ब्रिज पंबन यांवरही योग सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

## उत्तराखंडच्या पर्यटन विभागाने व्हायब्रंट गावांमध्ये केला योग दिन साजरा

◆ उत्तराखंड (वृत्तसंस्था) :

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, उत्तराखंड पर्यटन विकास परिषदेने उत्तरकाशी, चमोली आणि पिथोरागड सारख्या राज्यातील विविध जिल्ह्यांमधील भारत-चीन सीमेला लागून असलेल्या सीमावर्ती गावांमध्ये, जसे की माना, मलारी, जाडुंग, निलांग, हर्षिल, दुग्टू, नाबिधांग इत्यादींमध्ये विशेष योग दिनाचे आयोजन केले. भारत सरकारच्या व्हायब्रंट व्हिलेजेस योजनेअंतर्गत ग्रामीण पर्यटन, आरोग्य आणि सांस्कृतिक जागरूकता वाढवण्याच्या दिशेने हा कार्यक्रम एक उल्लेखनीय पाऊल आहे. यावेळी



स्थानिक नागरिक, युवक, शाळकरी मुले आणि भारतीय लष्कराचे जवान मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सहभागींना विविध योगासन, प्राणायाम आणि ध्यान तंत्रे शिकवण्यात आली. ग्रामीण आणि सीमावर्ती भागात योगाचे महत्त्व आणि निरोगी जीवनशैलीचा प्रचार करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

या उपक्रमाचा उद्देश केवळ योगाचे महत्त्व अधोरेखित करणे हा नव्हता तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्हायब्रंट व्हिलेजेस कार्यक्रमाच्या दृष्टिकोनानुसार सीमावर्ती गावांना सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा होता. यावेळी उत्तराखंड पर्यटन विकास परिषदेचे सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले की, उत्तराखंडचे शांत आणि नैसर्गिक वातावरण योगाभ्यासासाठी योग्य आहे. आमचा प्रयत्न आहे की पर्यटकांची ये-जा वाढू शकेल आणि स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतील.

## ॲक्युपंक्चर पदविका नोंदणीला जुलैमध्ये सुरुवात

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ॲक्युपंक्चर पदविका अभ्यासक्रमाच्या नोंदणी प्रक्रियेला जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून सुरुवात होणार आहे. राज्य सरकारने गतवर्षी दोन वर्षाच्या ॲक्युपंक्चर पदविका अभ्यासक्रमाला मान्यता दिली आहे. मान्यता मिळाल्यानंतर पहिल्या वर्षी या पदविका अभ्याक्रमाला तब्बल ४२३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी संकल्पनेतून आरोग्य सेवेतील उपचारांसाठी ॲक्युपंक्चर अभ्यासक्रमाचा नवा पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध झाला आहे. विज्ञान, वाणिज्य व कला अशा कोणत्याही शाखेतून इयत्ता बारावी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांला या अभ्याक्रमासाठी अर्ज करता येणार आहे. महाराष्ट्र सरकार आणि महाराष्ट्र अक्युपंक्चर परिषदेकडून मान्यताप्राप्त दोन वर्षांच्या पूर्णवेळ पदविका अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची प्रवेश परीक्षा देण्याची आवश्यकता नाही.

महाराष्ट्र अक्युपंक्चर परिषदेने मान्यता दिलेल्या अनुभवी प्रशिक्षकांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार असून, या अभ्यासक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक प्रशिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष रुग्णसेवेचा अनुभवही मिळणार असल्याची माहिती महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेचे प्रंबधक नारायण नवले यांनी दिली.

## आरेडिका येथे आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे भव्य आयोजन

◆ रायबरेली (वृत्तसंस्था):

११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मुख्य कार्यक्रम रायबरेली (अरेडिका) येथील मॉडर्न रेल्वे कोच फॅक्टरी येथील गोमती इनडोअर स्टेडियममध्ये आयोजित करण्यात आला होता. २१ जून २०२५ रोजी विशाखापट्टणम येथून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या थेट प्रक्षेपणासह भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वर्षी योग दिनाची थीम होती "योग फॉर वन अर्थ, वन हेल्थ", ज्यामध्ये संपूर्ण जगाच्या आरोग्याप्रती समर्पणाचा संदेश आहे. ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आरेडीका येथे एकूण ८ ठिकाणी मोठ्या प्रमाणात योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये ऑफिसर्स क्लब, पर्यवेक्षक क्लब, वर्कर्स क्लब, हॉस्पिटल,



केंद्रीय विद्यालय, शॉपिंग कॉम्प्लेक्स, सेंट्रल पार्क हे प्रमुख आहेत. यासोबतच शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये स्काऊट गाईड्सच्या मुलांकडून योगावरील विशेष पथनाट्याचेही आयोजन करण्यात आले होते. महाव्यवस्थापक प्रशांतकुमार मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली सर्व अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या मुख्य कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

महाव्यवस्थापकांनी अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना योगाचे फायदे सांगून नियमित योगासने करण्यास प्रेरित केले. विशेषतः ज्यांना सामान्य आरोग्य समस्या आहेत त्यांच्यासाठी योग फायदेशीर ठरू शकतो. यावेळी महाव्यवस्थापकांनी आरेडीका कॅम्पसमध्ये असलेल्या कॉलनी गेटजवळ बांधलेल्या ०२ नवीन तलावांची पाहणी केली तसेच तलावाजवळ बियाणे व झाडे लावली व पर्यावरण रक्षणाचा संदेशही दिला. याच शृंखलेत कुमार यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी योगाभ्यास केला.याशिवाय आरेडिका हॉस्पिटलच्या प्रांगणात योगाभ्यास आणि विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## आयटीआयतून रोजगाराची संधी

**मुंबई :** दहावीचा निकाल जाहीर होताच विद्यार्थ्यांना करिअरविषयीचे विविध पर्याय समोर येतात. बारावी किंवा महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच अनेक विद्यार्थी आता थेट कौशल्याधारित शिक्षणाकडे वळतात. अशा तरुणांसाठी ठाणे जिल्ह्यातील १० शासकीय आणि ७ खासगी संस्थांमध्ये एकूण ३ हजार १३६ जागा उपलब्ध आहेत. यासाठीची ऑनलाइन अर्ज प्रक्रिया २६ जूनपर्यंत सुरु राहणार आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर अर्ज भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे. त्या जागांसाठी प्रवेश अर्ज वाटपास सुरुवात झाली असून त्याची अंतिम मुदत येत्या २६ जून असल्याची माहिती संबंधित विभागाने दिली.

## सौरकृषी पंपांच्या समस्या सोडविण्यासाठी महावितरणचा पुढाकार

### शेतकऱ्यांसाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

राज्यात विविध योजनांमध्ये बसविण्यात आलेल्या एकूण सौर कृषी पंपांची संख्या ५ लाख ६५ हजारांवर पोहोचली असून महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. आणखी पाच लाख सौर कृषी पंप बसविण्यात येणार आहेत. सौर कृषी पंप बसविल्यानंतर त्यात काही बिघाड होण्याच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महावितरणने पुढाकार घेतला असून शेतकऱ्यांना घरबसल्या फोनवरून अथवा ऑनलाइन तक्रार करता येईल, अशी सुविधा उपलब्ध केली आहे. शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे.

#### वेबसाईटद्वारे नोंदणी करून तक्रार नोंदविता येणार

लाभार्थी शेतकऱ्यांना महावितरणच्या टोल फ्री नंबरवर फोन करून किंवा महावितरणच्या संबंधित वेबसाईटवर ऑनलाइन नोंदणी करून किंवा थेट संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर नोंदणी करून तक्रार नोंदविता येईल. तक्रार नोंदविताना शेतकऱ्याने सौर कृषी पंपाचा लाभार्थी क्रमांक लिहिला तर पुरेसे आहे. शेतकरी आपला नोंदणीकृत मोबाइल क्रमांक लिहूनही तक्रार करू शकतात. आपला जिल्हा, तालुका, गाव व स्वतःचे नाव अशी माहिती देऊनही तक्रार करता येईल.

मे महिन्याच्या अखेरीस आलेल्या वादळी वाऱ्यांमुळे आणि मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्स कोसळून नुकसान झाले. अशा प्रकारच्या विविध समस्या सोडविण्यासाठी व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे.

सौर कृषी पंप बसविल्यानंतर पंप चालत नसणे, सौर पॅनेलची नासधूस होणे, सौर ऊर्जा संच काम करत नाही, सौर पॅनेल्सची किंवा पंपाची चोरी होणे अथवा पंपातून कमी दाबाने पाणी येणे अशा विविध तक्रारी शेतकरी करू शकतील. सौर कृषी पंप संचाचा विमा उतरविण्यात आला आहे.

### विकास हायस्कूल शाळेत जागतिक योग दिवस साजरा

**मुंबई :** योग ही आपल्या प्राचीन परंपरेची एक अमूल्य देणगी आहे. मन आणि शरीर, विचार आणि कृती यांचा एकत्रित समन्वय साधत एक समग्र दृष्टिकोन तयार करतो तो योग. हा केवळ व्यायाम नाही तर स्वतःशी, जगाशी आणि निसर्गाशी एकतेची भावना, समर्पणाची भावना शोधण्याचा एक मार्ग आहे. हे उद्दिष्ट लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना ११ व्या जागतिक योग दिनानिमित्त योगासनांचे महत्त्व समजावे , निरोगी , आरोग्य विषयक जागरूकता निर्माण व्हावी, सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा या उद्देशाने विकास हायस्कूल अँड जूनियर कॉलेजमध्ये इयत्ता पाचवी ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी योग् प्रात्यक्षिक सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

## पश्चिम रेल्वेकडून योग दिन साजरा

◆ मुंबई (प्रतिनीधी) :

पश्चिम रेल्वेवर आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. अशोक कुमार मिश्रा, पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक, उत्सव हॉल, बधवार पार्क, मुंबई येथे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या वर्षाची थीम "एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग" आहे. पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, कॉमन योग प्रोटोकॉल अंतर्गत योग आसनांचे जीएम अशोक कुमार मिश्रा, विभाग प्रमुख, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, डब्ल्यूआर डब्ल्यूडब्ल्यूओच्या अध्यक्षा क्षामा मिश्रा, पश्चिम रेल्वे महिला कल्याण संस्थाच्या कार्यकारी समिती सदस्य तसेच पश्चिम रेल्वेचे कर्मचारी. सत्राचे नेतृत्व डॉ. जॅन्सी शेखर आणि त्यांच्या टीमने केले. याशिवाय, आरपीएफ जवानांनी मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकावर वंदे भारत ट्रेनच्या बरोबरीने योगा करून उत्सवात सक्रिय सहभाग घेतला. ज्यामध्ये आरोग्य आणि रेल्वे ऑपरेशन्समधील सामंजस्य अधोरेखित करण्यात आले होते.

विनीत पुढे म्हणाले की, यावर्षीची 'योग फॉर वन अर्थ, वन हेल्थ' ही थीम मानवी कल्याण आणि आपल्या ग्रहाचे आरोग्य यांच्यातील सर्वांगीण संबंध अधोरेखित करते. हे संतुलित जीवनशैली, शाश्वत जीवन आणि जागतिक सुसंवाद वाढविण्यात योगाची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करते.

### डिजिटल साक्षरतेच्या दिशेने फाऊंडेशनचे महत्त्वपूर्ण पाऊल

# महापालिकेच्या शाळांमध्ये १० संगणक प्रयोगशाळांचे लोकार्पण

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

मुंबई स्थित स्नेह आशा फाऊंडेशनतर्फे डिजिटल साक्षरतेच्या दिशेने महत्वाचे पाऊल उचलत बृहन्मुंबई महानगरपालिका आणि ठाणे महापालिकाक्षेत्रातील विविध शाळांमध्ये १० अद्ययावत संगणक प्रयोगशाळांचे उद्घाटन करण्यात आले. तसेच या प्रसंगी संस्थेतर्फे शिष्यवृत्ती योजनेच्या तिसऱ्या बॅचमध्ये निवड झालेल्या १२ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आज करण्यात आला. वांद्रे पश्चिम येथील रंगशारदा सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात




प्रमुख पाहुण्यांमध्ये महाराष्ट्र राज्याचे माहिती तंत्रज्ञान मंत्री आशीष शेलार, अभिनेता सलमान खान, क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे, उद्योजक निरंजन हिरानंदानी, एमसीजीएमचे अतिरिक्त आयुक्त डॉ. अमित सैनी, व बांधकाम व्यावसायिक बोमन ईरानी आदी उपस्थित होते. त्याचबरोबर यामध्ये शासकीय अधिकारी, शिक्षण तज्ज्ञ, कॉर्पोरेट क्षेत्रातील पदाधिकारी, देणगीदार, समाजसेवक व नामवंत व्यक्तींचा मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. स्नेहआशा संस्थेच्या डिजिटल साक्षरता कार्यक्रमाच्या अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या या संगणक प्रयोगशाळांमध्ये एकूण ६००हून अधिक उच्च-क्षमता संगणक बसवण्यात आले असून या उपक्रमाचा ६ वी ते १० वी इयत्तांमधील १५,००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना थेट लाभ होणार आहे. संगणक साक्षरता, कोडिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा विश्लेषण यासारख्या आधुनिक कौशल्यांचे प्रशिक्षण या माध्यमातून दिले जाणार आहे.

या कार्यक्रमात शिष्यवृत्ती योजनेच्या तिसऱ्या बॅच अंतर्गत निवड झालेल्या १२ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सदर योजना 'सरस्वती', 'शक्ती' आणि 'लक्ष्मी' अशा तीन उपघटकांमध्ये कार्यान्वित असून विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, मार्गदर्शन, संगणक साहित्य, कोचिंग व करिअर सल्ला यांचा समावेश असलेले व्यापक पाठबळ पुरवले जाते."समाजातील शेवटच्या घटकापर्यंत डिजिटल ज्ञान पोहोचवण्यासाठी स्थापन केलेली संस्था ही केवळ करिअरची संधी नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि आत्मभान जागवणारे माध्यम ठरणार आहे.

### ज्येष्ठ नागरिकांची जीबीआरची मागणी

## सोसायटीचा पुनर्विकास रखडला

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

मुंबईसारख्या महानगरात जुन्या इमारतींचा पुनर्विकास वेगाने सुरू आहे. मात्र, पुनर्विकासाच्या प्रक्रियेत अनेकदा सोसायटी सदस्यांमध्ये मतभेद, वाद निर्माण होतात आणि प्रकरण उपनिबंधकांच्या कार्यालयात जाते. अशा पार्श्वभूमीवर मुंबई ग्राहक पंचायतीने नुकतीच जनहितार्थ मागणी केली आहे की, विकासक निवड प्रक्रियेत उपनिबंधकांचा हस्तक्षेप असू नये, कारण हा निर्णय संपूर्णतः सोसायटी सदस्यांचा असतो. बोरिवली पश्चिम येथील एसव्ही रोडलगत असलेल्या मधुमिलन सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड (मंगल कुंज) या ५८ वर्षांपूर्वी बांधलेल्या सोसायटीच्या पुनर्विकासाची प्रक्रिया सध्या रखडली आहे. इमारतीची अवस्था धोकादायक बनली असून २०१५ मध्ये ती सी १ म्हणून प्रमाणित करण्यात आली होती. अखेर २०२३ मध्ये पुनर्विकास प्रक्रियेला गती मिळाली. सुमारे २१८ कुटुंबीय असलेल्या या सोसायटीने सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून अकरा विकासकांपैकी दोन विकासकांची निवडण्यात आले.

एका विकासकाकडून अधिक फायदेशीर प्रस्ताव देण्यात आला असला तरी काही सदस्यांनी दुसऱ्या विकासकाला पाठिंबा दर्शवला. झालेल्या मतदानात निकाल जवळपास बरोबरीचा आला, त्यामुळे निर्णय स्पष्ट होऊ शकला नाही. मात्र, काही सदस्य मतदान प्रक्रिया रोखण्याचा प्रयत्न करत असून सध्याच्या समिती सदस्यांविरुद्ध कट रचून त्यांना पदावरून हटविण्याची मागणी करत आहेत. दुसरीकडे, सध्याचे समिती सदस्य नियमानुसारच सर्व प्रक्रिया व्हावी यावर ठाम आहेत. या सगळ्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नागरिकांनी जीबीआर घेऊन निर्णय अंतिम करावा, अशी मागणी लावून धरली आहे. रहिवाशांनी लवकरात लवकर स्पष्ट निर्णय घ्यावा, अन्यथा इमारतीचे भवितव्य अंधारात जाईल, असा इशाराही देण्यात येत आहे. पुनर्विकासाचा निर्णय लोकशाही पद्धतीने, पारदर्शकपणे आणि एकत्रित सहमतीने होणे आवश्यक आहे- अन्यथा वेळेवर पुनर्विकास न झाल्यास तेथील रहिवाशांचे जीवनच धोक्यात येऊ शकते.



## कडोंमपातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

**कल्याण :** आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, आर्ट ऑफ लिव्हिंग आणि एसकेडीसीएल यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबीर कल्याण स्थानकाजवळील कै. दिलीप कपोते वाहनतळाच्या सहाव्या मजल्यावर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

त्यांनी आपल्या मनोगतात योगाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, "योग ही एखाद्या दिवसापुरती उत्सवाची गोष्ट नसून, ती आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग असावी. जसे गाड्यांना वेळोवेळी सर्व्हिसिंगची गरज असते, तसेच आपल्या मनालाही विश्रांती, एकाग्रता व सकारात्मकतेसाठी योगाची गरज असते."

या योग शिबिरात आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ज्येष्ठ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली श्वसन तंत्र, आसने व मानसिक शांततेसाठी विविध आसन प्रकार शिकवण्यात आले. महापालिका क्षेत्रातील शाळा तसेच महाविद्यालयांमध्येही शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने करीत योगाभ्यासाचा लाभ घेतला.

# शहापुरात ३२७ गाव-पाड्यांमध्ये स्मशानभूमीची गैरसोय

## पावसाळ्यात मृतदेहाचे दहन करण्याचा प्रश्न गंभीर

◆ शहापूर (वार्ताहर) :

आदिवासी नागरिकांचे प्रमाण जास्त असणाऱ्या शहापूर तालुक्यात सुमारे ३२७ गाव-पाड्यांमध्ये स्मशानभूमीच नसल्याची बाब उघडकीस आली आहे. स्मशानभूमी अभावी मरणानंतरही मृतदेहाची हेळसांड होत असून पावसाळ्यात मृतदेहाचे दहन करण्याचा प्रश्न गंभीर होत आहे.

ठाणे जिल्ह्याचा शहापूर तालुक्यात प्रामुख्याने आदिवासी नागरिक वास्तव्यास आहेत. यामध्ये ११० ग्रामपंचायतींमध्ये २२७ गावे आणि ५१४ पाडे येतात. तालुक्यात तानसा, दापूर, कसारा (खु), भुईशेत, भोयेपाडा, गरेलपाडा, सावरदेव, पेंढरी, बोराळा, वारलीपाडा, भेकरमाळ, सावरखुट, उठावा, दापूरमाळ अशा ३२७ गावपाड्यांवर स्मशानभूमी नसल्याचे उघडकीस आले आहे. येथील ग्रामस्थांना पावसाळ्यात अंत्यसंस्कार करण्यासाठी तारेवरची कसरत



करावी लागत असल्याचे चित्र आहे. गावपाड्यांमधील अंतर्गत वाद या मुख्य कारणामुळे बहुतांशी ठिकाणी स्मशानभूमीची कामे मंजूर होऊन देखील ती रखडलेली आहेत.

तर, स्मशानभूमीचे पत्रे उडणे, स्मशानभूमी जमीनदोस्त होणे, स्मशानभूमीसाठी वनखात्याच्या जागेची अडचण, खाजगी जागेची अडचण, तर काही ठिकाणी रस्ता नसणे यामुळे स्मशानभूमी निर्मितीत अडचणी निर्माण होत आहेत. आदिवासी अतिदुर्गम भागात दरवर्षी लाखो रुपयांचा निधी खर्च केला जातो. मात्र, तालुक्यातील नागरिकांना स्मशानभूमीसाठी प्रतिक्षा करावी लागत असल्याचे दिसून येत आहे. अनेक गावात स्मशानभूमीपर्यंत रस्ता नसल्याने पावसाळ्यात चिखलातून वाट काढावी लागते आहे. तर, काही ठिकाणी नदीतून मृतदेह न्यावे लागत आहेत. तर, उर्वरित स्मशानभूमीत छत नसल्याने उघड्यावरच अंत्यसंस्कार करावे लागत असल्याचे उघडकीस येत आहे. पावसामुळे मृतदेहाची हेळसांड होत असून शहापूर तालुक्यात हा प्रश्न गंभीर होत आहे. शहापूर तालुक्यात ११० ग्रामपंचायतींमध्ये २२७ गावे आणि ५१४ पाडे येतात. तालुक्यात आरसीसी बांधकाम असलेल्या १९७ स्मशानभूमी आहेत. तसेच, २३१ स्मशानभूमी सुस्थितीत आहेत. तर, ३२६ ठिकाणी पक्क्या स्वरूपाच्या स्मशानभूमी नसून २२९ ठिकाणी स्मशानभूमींची पडझड झाली आहे. तसेच जमीन उपलब्ध नसल्याने देखील २२९ ठिकाणी स्मशानभूमी रखडल्या आहेत. याशिवाय बहुतांशी ठिकाणी रस्ते, वीज आणि पाण्याची सुविधा नसल्याने अंत्यसंस्कारासाठी नागरिकांची गैरसोय होत आहे.

### सीआरझेड क्षेत्रातील बांधकामेही उद्ध्वस्त

## ठाणे महापालिकेच्या ३३ अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई



◆ ठाणे (प्रतिनिधी) :

उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश आणि प्रभाग समितीच्या बीट निरिक्षकांनी केलेल्या पाहणीत आढळलेल्या ३३ अनधिकृत बांधकामांवर महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई केली. ही कारवाई १९ आणि २० जून रोजी करण्यात आली. यात पूर्ण इमारत, प्लिंथ, कॉलम, स्लॅब, वाढीव बांधकाम याप्रकारच्या बांधकामांचा समावेश आहे. यापुढेही अनधिकृत बांधकामांच्या निष्कासनाची प्रभाग समितीनिहाय कारवाई सुरूच राहणार आहे.

ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या आदेशानुसार, प्रत्येक प्रभाग समिती क्षेत्रात सहाय्यक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक स्थापन केले आहे. या पथकांना आपापल्या क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबतच्या तक्रारी आणि प्रत्यक्ष पाहणी यांच्या आधारे तत्काळ कारवाई करण्याचे आदेश आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. त्यानुसार, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

तळ मजला अधिक चार मजले, सीआरझेड क्षेत्रात उभारण्यात आलेले भंगाराचे गोडावून, व्याप्त अनधिकृत इमारतीवरील वाढीव बांधकाम, प्लिंथ, दुकानातील वाढीव बांधकाम आदी वेगवेगळ्या तक्रारींनुसार ठाणे महापालिका क्षेत्रात १९ आणि २० जून रोजी झालेल्या कारवाईत एकूण ३३ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती उपायुक्त (अतिक्रमण विभाग) शंकर पाटोळे यांनी दिली. ही कारवाई यानंतरही सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या कारवाईमध्ये उपायुक्त (परिमंडळ), सर्व सहाय्यक आयुक्त, अतिक्रमण आणि बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. या कारवाईसाठी पोकलेन, जेसीबी, गॅस कटर, ट्रॅक्टर ब्रेकर, मनुष्यबळ यांचा वापर करण्यात आला. पोलीस आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान यांच्या बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आल्याचेही पाटोळे यांनी सांगितले.

### कारवाईच्या आकडेवारीचा तक्ता

| | |
|---|---|
| नौपाडा-कोपरी | ०२ |
| दिवा | १२ |
| मुंब्रा | ०३ |
| कळवा | ०४ |
| उथळसर | ०१ |
| माजिवडा-मानपाडा | ०५ |
| वर्तक नगर | ०२ |
| लोकमान्य नगर | ०२ |
| वागळे इस्टेट | ०२ |
| एकूण | ३३ |

## वेचक

### आर्य गुरुकुल येथे योग दिन साजरा



**कल्याण :** आर्य गुरुकुल, नांदिवली येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साही आणि समावेशक पद्धतीने साजरा करण्यात आला. ज्यामध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि समुदायाला एकत्रित करून शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगाचे फायदे सांगितले गेले. हा कार्यक्रम शाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये समग्र आरोग्य आणि निरोगीपणा वाढवण्याच्या वचनबद्धतेचा पुरावा होता. शाळेच्या सभागृहात आयोजित एका मोठ्या गट योग सत्राने हा उत्सव सुरू झाला. या सत्रात ४०० हून अधिक विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी विविध योग आसनांमध्ये आणि श्वासोच्छवासाच्या व्यायामात भाग घेतला. शांत आणि प्रसन्न वातावरण शाळेच्या दिवसाच्या नेहमीच्या गर्दीपेक्षा अगदी वेगळे होते. "योग हा केवळ शारीरिक व्यायाम नाही; तो आपल्या जीवनात संतुलन निर्माण करण्याबद्दल आहे," असे मुख्याध्यापिका दिव्या बोरसे म्हणाल्या.

### सुदृढ आरोग्य हीच खरी श्रीमंती : कविता मोर्या



**कल्याण :** कल्याणच्या सम्राट अशोक विद्यालयात योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाप्रसंगी पतंजली योग समितीच्या प्रशिक्षक कविता मोर्या व प्रीती गुप्ता उपस्थित होते. कविता मोर्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी बाहेरील पदार्थ खाणे टाळावे. आई व ताईने घरी बनवलेला स्वयंपाक आवडीने खा, शक्ती येईल. आपल्या देशाबरोबर बाहेरील देशातील नागरिक ही योगासने करतात. सातत्याने योगा केला तर आजार होत नाहीत. आपण निरोगी राहतो. सुदृढ आरोग्य हीच आपली श्रीमंती आहे, म्हणून योगा करणे महत्त्वाचे आहे. दैनंदिन जीवनासाठी योगसाधना आणि योग तपश्चर्येचे महत्त्व मुख्याध्यापक गुलाबराव पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकेतून विद्यार्थ्यांना सांगितले. विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापक पाटील आणि इतर शिक्षकांनी देखील योगासने केली. कविता मोर्या व प्रीती गुप्ता यांचे सह शिक्षक गणेश पाटील यांनी संस्था व शाळेच्या वतीने आभार मानले.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबिराचे आयोजन

◆ मीरा-भाईंदर (वार्ताहर):

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने अप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह, मिरा रोड (पूर्व) येथे सकाळी ठीक ८.०० वाजता भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रत्यक्ष उपस्थितीत उत्साहात पार पडला.



शिबिराच्या प्रारंभी प्रख्यात योग शिक्षिका यांनी उपस्थितांना योगाचे महत्व, योगासने, प्राणायाम व ध्यान याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी दैनंदिन जीवनात योगाचा सकारात्मक प्रभाव, विविध शारीरिक-मानसिक आरोग्य समस्यांवरील योगाच्या उपाययोजना, तसेच योगाभ्यासाची शास्त्रशुद्ध पद्धती यावर प्रकाश टाकला. विशेषतः धकाधकीच्या जीवनशैलीमुळे होणाऱ्या तणाव, निद्रानाश, मधुमेह, उच्च रक्तदाब इत्यादी आजारांपासून योगाने होणारा बचाव याचे प्रत्यक्ष उदाहरणासह विवेचन करण्यात आले.

यानंतर मा. आयुक्त राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत, सर्व विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक यांनी एका तासाचा सामूहिक योगाभ्यास केला.

## आशा स्वयंसेविका मानधनापासून वंचित

◆ मुरबाड (वार्ताहर) :

तालुक्यातील आरोग्य अभियानात काम करणाऱ्या आशा सेविका व गटप्रवर्तक यांना केंद्र सरकारकडील जानेवारी महिन्यांपासून व राज्य शासनाकडून एप्रिल महिन्यापासून मानधन न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. केंद्र व राज्य शासनाने रात्रंदिवस कामे दिली असून ती पूर्ण झालीच पाहिजेत, असे सांगण्यात आले आहे. या आशा स्वयंसेविका दुर्गम व अतिदुर्गम भागात जाऊन रूग्णांना आरोग्य सेवेचे फायदे मिळवून देत आहेत.

आशा स्वयंसेविकांमुळे आरोग्य विभागाला ग्रामीण वाड्यापाड्यातील माहिती मिळते. एखादा कठीण प्रसंग उद्भवल्यास आशासेविका त्या रुग्णाच्या मागे उभ्या राहत असतात. गरोदर मातेला ग्रामीण रूग्णालयात उपचार नाही झाले तर त्यांना स्वखर्चाने बाहेरील हॉस्पिटलमधे घेऊन जायचे शिवाय जोपर्यंत त्या महिलेची प्रसूती होत नाहीत तोपर्यंत त्यांना तिथेच थांबुन राहावे लागते व त्यांची काळजी घ्यावी लागते. तसेच त्यांना रुग्णालयात बसण्यासाठी किंवा रात्री झोपण्यासाठी जागा नसल्याने ताटकळत बसावे लागते. हॉस्पिटलमधील कर्मचारीवर्ग त्यांना तुच्छतेची वागणूक देत असतात. त्यातच गेल्या पाच महिन्यांपासून पूर्ण मानधन उपलब्ध न झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. पण त्यांच्या या समस्येकडे बघण्याचे गांभीर्य केंद्र व राज्य शासनाकडून दिसत नाही. पावसाळ्यात त्यांची जबाबदारी वाढते तेव्हा त्यांना वेळेवर मानधन देणे ही केंद्र व राज्य शासनाची जबाबदारी असताना काम करुनही त्यांना वेळेत मानधन मिळत नसल्याने त्यांची आर्थिक घडी बिघडली आहे.

## सोमनाथ येथील शिवलिंग दर्शनासाठी ठाण्यात आणणार

**ठाणे :** आर्ट ऑफ लिव्हिंगचे गुरूदेव श्री श्री रविशंकर यांच्या सानिध्यातील सोमनाथ येथील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले अद्भूत शिवलिंग येत्या बुधवारी (ता. २५) ठाण्यात आणले जाणार आहे. यानिमित्ताने भाविकांना या शिवलिंगाच्या दर्शनाची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे आर्ट ऑफ लिव्हिंगच्या सदस्यांनी सांगितले. २५ जून रोजी संध्याकाळी साडे पाच वाजता आर मॉलमधील इलिफ रिटझ बॅन्क्वेट सभागृह, तिसरा माळा, घोडबंदर रस्ता, ठाणे पश्चिम येथे सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन आणि रुद्र पुजा आणि सत्संग पार पडणार आहे. ठाणे, कल्याण, मुंबई, डोंबिवली परिसरातील अधिकाधिक नागरिकांनी या दर्शन सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

## 'सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम ८.०' यशस्वीरीत्या पूर्ण

◆ मीरा-भाईंदर (वार्ताहर) :

शहराच्या स्वच्छतेसाठी तरुणाईने खांद्याला खांदा लावून काम केल्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम ८.०'. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने राबवण्यात आलेला हा उपक्रम १९ ऑगस्ट २०२४ ते २० जानेवारी २०२५ या कालावधीत यशस्वीरित्या पार पडला. या इंटर्नशिपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वच्छता मोहिमा, जनजागृती रॅली, क्षेत्रीय निरीक्षण, माहिती संकलन, दस्तऐवजीकरण तसेच महापालिकेच्या विविध विभागांशी प्रत्यक्ष समन्वय साधण्याचा अनुभव मिळाला. या उपक्रमाने केवळ प्रशिक्षणच दिले नाही, तर शहराच्या स्वच्छतेसाठी योगदान देण्याची संधीही निर्माण केली आहे.



मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालय येथे १९ जून २०२५ रोजी माननीय आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा यांच्या निर्देशानुसार व शहर अभियंता दीपक खांबीत यांच्या उपस्थितीत 'सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम ८.०' पूर्ण केलेल्या सर्व तरुणांना त्यांच्या समर्पण, मेहनत आणि समाजासाठी दिलेल्या योगदानाबद्दल प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. महानगरपालिका प्रशासनाने या युवा सहभागाचे विशेष कौतुक करताना सांगितले की, "सफाईमित्र इंटर्नशिप हा केवळ एक उपक्रम नाही, तर तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकी व नागरी जबाबदारी जागवणारी एक चळवळ आहे." शहर स्वच्छतेच्या दिशेने वाटचाल करताना तरुणाईचा आवाज आणि कृती दोन्ही महत्त्वाची आहेत हे या उपक्रमातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. भविष्यातही अशा उपक्रमामध्ये अधिकाधिक तरुणांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहरातील विद्यार्थ्यांना केले आहे. या प्रमाणपत्र वितरण समारंभात कार्यकारी अभियंता शरद नानेगावकर उपस्थित होते.

## सफाई मित्रांच्या सुरक्षेसाठी ११६ पीपीई किट्सचे वाटप

◆ मीरा-भाईंदर (वार्ताहर):

साफसफाई कामगारांच्या सुरक्षितता, सन्मान आणि समावेशासाठी केंद्र सरकारने २०२२ मध्ये सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालय आणि गृहनिर्माण व नगरविकास मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने 'NAMASTE' (National Action for Mechanised Sanitation Ecosystem) ही योजना सुरु केली आहे. या योजनेची अंमलबजावणी राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ (एनएसकेएफडीसी) यांच्या माध्यमातून होत आहे.

योजनेचा पहिला टप्पा गटार/सेप्टिक टँक साफ करणारे मजूर



यांच्यासाठी होता. या अंतर्गत, मीरा-भाईंदर महानगरपालिकेने (एमबीएमसी) कार्यरत गटार, सेप्टिक टँक साफ करणाऱ्या मजुरांची वैयक्तिक, आरोग्यविषयक आणि रोजगाराशी संबंधित माहिती संकलित करून राष्ट्रीय एमआयएस प्रणालीमध्ये यशस्वीपणे नोंदवली आहे. योजनेच्या पुढील टप्प्यात एमबीएमसीला एनएसकेएफडीसी कडून ११६ पीपीई किट्स प्राप्त झाले आहेत. सदर किट्स साफाईमित्रांना वाटपाचा कार्यक्रम मीरा-भाईंदर महानगरपालिका मुख्यालयात आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांच्या निर्देशानुसार शहर अभियंता दीपक खांबीत यांच्या उपस्थितीत पार पडला.

या किट्समुळे कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेत वाढ होणार असून, ही पावले साफाईमित्रांच्या आरोग्याचा आणि हक्कांचा सन्मान करणारी आहेत. तसेच, एमबीएमसीने नमस्ते योजनेच्या मार्गदर्शनाखाली 'आयुष्मान भारत कार्ड' नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे. सध्या ८ कामगारांची यशस्वी नोंदणी झाली असून, त्यांना आणि त्यांच्या कुटुंबांना कॅशलेस आरोग्य सेवा मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे.

यांत्रिक साफसफाईत प्रत्यक्ष प्रशिक्षण दिल्यामुळे टप्प्याटप्प्याने हाताळणी कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच सफाई कर्मचारी यांचे आरोग्य संवर्धन होऊन नक्कीच त्यांच्या कार्यात गतिमानता येईल असे मत पालिका मा. आयुक्तांनी व्यक्त केले आहे.

## कोकण रेल्वेच्या तिकिटासाठी दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या

### खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते उद्घाटन

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

खासदार म्हणून निवडून आल्याच्या एक वर्षाच्या आतच नरेश म्हस्के यांनी रेल्वेविषयक अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. गेल्या चार वर्षांपासून गणेशोत्सवासाठी कोकणात रेल्वेने जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी ठाणे रेल्वे स्थानकात तिकीटांसाठी दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या सुरू कराव्यात ही प्रवासी संघटनेची मागणी प्रलंबित होती. खासदार नरेश म्हस्के यांनी पाठपुरावा केल्यानंतर नुकतेच या दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या सुरु झाल्या असून त्यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न झाले.

गणेशोत्सव सुरू व्हायच्या तीन महिने आधीपासूनच मुंबई, ठाणे आणि उपनगरात स्थायिक झालेल्या चाकरमान्यांना कोकणात जाण्याचे वेध लागतात. कोकणात जाण्यासाठी रेल्वे प्रवास हा सुखकर असल्याने लाखो गणेशभक्त कोकण रेल्वेचा पर्याय निवडतात. मात्र अपुऱ्या आरक्षण खिडक्यांमुळे गणेशभक्तांची वेळ वाया जाते आणि रांगेत उभे राहून दमछाक होत होती. ही गैरसोय दूर व्हावी यासाठी प्रवासी संघटनेने ठाणे रेल्वे स्थानकात



कोकण रेल्वेच्या तिकीटासाठी दोन अतिरिक्त आरक्षण सुरु करण्याची मागणी केली होती.

खासदार नरेश म्हस्के यांना प्रवाशांच्या प्रश्नांची जाणीव असल्याने अवघ्या काही दिवसातच ही मागणी त्यांनी मध्य रेल्वेकडून मान्य करुन घेतली. २० जून ते ५ जुलै २०२५ या दरम्यान ठाणे रेल्वे स्थानकाजवळील मुख्य पोस्ट ऑफिस इमारती समोरील मुख्य आरक्षण केंद्र येथे या दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या (खिडकी क्रमांक ७ आणि ८) सुरु राहणार आहेत.

## ठाण्यात तीन दिवसांत ३५ वृक्ष पडले, ११ वाहनांचे नुकसान

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून पावसाळ्यात वृक्ष उन्मळून पडण्याचे प्रकार घडत आहेत. अशा घटनांमध्ये यापुर्वी काही नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे.

यंदाही पावसाळ्यात वृक्ष उन्मळून पडून दुर्घटना घडू नयेत यासाठी ठाणे महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाने काही महिन्यांपुर्वी वृक्ष छाटणी मोहिम राबवली. या मोहिमेनंतरही शहरात वृक्ष उन्मळून पडण्याचे प्रकार सुरूच असून गेल्या तीन दिवसांत शहरात ३५ वृक्ष उन्मळून पडले आहेत. या घटनेत कुणालाही दुखापत झालेली नसली तरी ११ वाहनांचे नुकसान झाले आहे.

### साखरे गावात देशातील सर्वात जड बॉक्स गर्डर यशस्वीरीत्या बसवला

## ठाणे-पालघरमध्ये बुलेट ट्रेनच्या उभारणीत ऐतिहासिक टप्पा

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील कामांमध्ये एक ऐतिहासिक टप्पा गाठण्यात आला आहे. नॅशनल हाय-स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (NHSRCL) ने पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील साखरे गावात ४० मीटर लांबीचा पूर्ण लांबीचा प्री-स्ट्रेस्ड काँक्रीट (PSC) बॉक्स गर्डर यशस्वीरित्या बसवला आहे. महाराष्ट्रात अशा प्रकारचा पहिलाच गर्डर बसवण्यात आल्याने हा क्षण अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे.



हा गर्डर ९७० मेट्रिक टन वजनाचा असून त्यासाठी ३९० घनमीटर काँक्रीट आणि ४२ मेट्रिक टन स्टील वापरण्यात आले आहे. विशेष म्हणजे हे गर्डर्स कोणतेही सांधे न ठेवता, एकसंध स्वरूपात बनवले जातात. प्रकल्पात या प्रकारचे गर्डर्स वापरणे हे कामाच्या जलद गतीसाठी उपयुक्त ठरत असून ते सेग्मेंटल गर्डर्सच्या तुलनेत दहा पट जलद काम पूर्ण करतात. ठाणे ते पालघरपर्यंत बुलेट ट्रेनसाठी उभारण्यात येणाऱ्या उंचावरील मार्गिका (व्हायाडक्ट), डोंगरी बोगदे, विशेष मातीच्या संरचना आणि स्थानकांच्या कामांमध्ये सातत्याने प्रगती होत आहे. शिळफाटा ते झरळी (महाराष्ट्र-गुजरात सीमा) दरम्यान १३५ किमी लांबीच्या उंचावरील मार्गिकेचा समावेश असून यामध्ये १०३ किमी लांबीचा व्हायाडक्ट, २.३ किमी लांबीचे स्टील पूल, १.३ किमी स्थानक परिसर आणि ११ किमी बोगदे व मातीची संरचना यांचा समावेश आहे.

या प्रकल्पासाठी पालघर जिल्ह्यात अनेक कास्टिंग यार्ड्स कार्यान्वित असून गर्डर्सची निर्मिती, साठवणूक व बसवणी तंत्रज्ञानयुक्त स्वदेशी यंत्रसामग्रीच्या सहाय्याने करण्यात येते. अलीकडेच विरार व बोईसर स्थानकांवरील पहिल्या स्लॅबच्या कास्टिंगचे कामही पूर्ण झाले असून, ठाणे-पालघर विभागातून बुलेट ट्रेन प्रकल्पात यशस्वी गतीने पुढे वाटचाल होत आहे.

## महानगरपालिकेचा ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

◆ भिवंडी (वार्ताहर) :

२१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्रीडा विभागामार्फत २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर (भाप्रसे) यांच्या उपस्थितीत स्वर्गीय राजय्या गाजेंगी हॉल येथे साजरा करण्यात आला.

योग ही भारताने जगाला दिलेली एक अमूल्य देणगी आहे. योग हा भारताच्या प्राचीन परंपरेचा एक अमूल्य वारसा आहे. महानगरपालिकेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या योग दिन कार्यक्रमास अंबिका योगाश्रम



ठाणे, शाखा भिवंडी यांचे प्रशिक्षित योग गुरुचे मार्गदर्शन, योगासने, प्राणायाम व ध्यान यांचे प्रात्यक्षिके आणि आरोग्य व मानसिक शांततेवर मार्गदर्शन करण्यात आले. या योग दिन कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त विक्रम दराडे, सहायक आयुक्त (क्रीडा) नितीन पाटील, सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन क्रीडा अधिकारी शरद कलावंत आणि क्रीडा विभाग प्रमुख मिलिंद पळसुले यांनी केले.






ओंजळ

**पल्लवी अष्टेकर**

आजचे जग स्मार्ट झालेय, पण आपणही तितकेच स्मार्ट झालोय का? मोबाइल हातात घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी एक प्रश्न-जी कामे आपण करतो त्यात वेळ, श्रम व पैसा वाचवू शकतो का?

उत्तर आहे – हो, जर आपण "कृत्रिम बुद्धिमत्ता" म्हणजेच Artificial Intelligence (एआय)चा योग्य वापर करत असू, तर नक्कीच.

कृत्रिम बुद्धिमत्ता हे फक्त वैज्ञानिक, संगणक अभियंते किंवा मोठ्या कंपन्यांचे क्षेत्र उरलेले नाही. आता ही एक अशी गोष्ट झाली आहे, जिचा वापर सामान्य शेतकरी, गृहिणी, दुकानदार, विद्यार्थी-अगदी कुणीही करू शकतो.

थोडक्यात सांगायचे झाले, तर एखादी मशीन किंवा ॲप आपल्यासारखे विचार करतं, शिकतं, निर्णय घेतं - हे म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता. गाणी सुचवणं, व्हॉट्सॲपवर भाषांतर करणं, फोटोवरून मजकूर ओळखणं हे सगळं एआयद्वारे शक्य झालंय. एआय सर्व-सामान्यांसाठी उपलब्ध आहे. मोबाइलवर गुगल, व्हॉट्सॲप, चॅटजीपीटी अशा ॲप्समधून एआयचा वापर करता येईल.




सामान्य माणसासाठी उपयुक्त एआय टूल्स - थेट वापरण्यासारखी आहेत.

१. चॅटजीपीटी : एखादा प्रश्न विचारायचा, माहिती हवी आहे, एखादा निबंध, ईमेल, कविता, भाषांतर हवं आहे का? चॅटजीपीटी वापरा.

२. डीएएलएलई – "पावसात भिजणारा शेतकरी" किंवा "आकाशात उडणारी वाघीण" असं चित्र हवंय? लिहा आणि बघा, हे टूल चित्र तयार करतं! लिहिलेल्या वर्णनावरती हे एआय ॲप तुम्हाला सुंदर चित्रे बनवून देऊ शकेल.

३. कॅनवा एआय टूल्स : एखादी जाहिरात, सोशल मीडिया पोस्ट, लग्नपत्रिका, मेनू कार्ड तयार करायचा आहे? एका झटक्यात तुम्हाला अतिशय कठीण डिझाईन्स चुटकीसरशी मिळून जातील. कॅन्वाचे Magic Write आणि Design AI वापरा.

४. Google Translate + Lens : एखादी परदेशी भाषा वाचायची आहे - फोटो काढा आणि तुमच्या भाषेत वाचा : हाही एआयचा चमत्कार आहे किंवा गुगल लेन्स वापरून एखाद्या फोटोमधली कुठलीही गोष्ट ओळखा. एखाद्या वनस्पती किंवा चित्रावरून तिचा पूर्ण तपशील मिळवा.

५. Microsoft Copilot / Bing AI : ऑफिसचं काम स्मार्ट करायचंय? रिपोर्ट, मेल, एक्सेलमध्ये सूत्र तयार करायचंय? Copilot तुमचं काम सोपं करतो.

६. युट्यूब एआय : तुम्ही काय शिकताय, पाहताय – त्यावरून तुमच्यासाठी सुचवलेले व्हीडिओ हे एआयमुळेच शक्य आहे.

७. Grammarly AI : इंग्रजी लिहायचं आणि चुकायचं नसेल, तर हे टूल तुम्हाला उत्तम पद्धतीत मदत करू शकेल. या सर्व गोष्टी व खूप काही सहजरीत्या ही साधनं तुम्हाला मदत करू शकतील.

कसा उपयोग करावा सामान्य माणसाने? काही आपण उदाहरणार्थ बघूया.

शेतकरी : आपला भारत देश शेतीप्रधान आहे. शेतकरी मोबाइल ॲप्समधून हवामान, खत, कीड नियंत्रण, मार्केट दर मिळवू शकतो. हवामानाचा अंदाज, अचूक माहिती एआयला देईल. शेतकऱ्याला तो अशा अनेक प्रकारात मार्गदर्शन करू शकतो. त्यामुळे शेतीला नुकसान पोहोचणार नाही.

विद्यार्थी : चॅटजीपीटीवरून शंका सोडवा, भाषांतर करा, नोट्स काढा, परीक्षेची तयारी करा या गोष्टी सुलभ होतात.

गृहिणी : घरगुती व्यवसायासाठी Canva वापरून डिझाईन तयार करा, चॅटजीपीटीकडून यादी करा. घरगुती काम, उद्योग, कपड्यांवर डिझाईन्स, हातावरची कामे जसे एम्ब्रॉयडरी, तोरण, रांगोळी, घर सजावटीच्या गोष्टी बनवायच्या असतील, तर अशा सगळ्यांमध्ये एआयचा वापर होऊ शकतो.

दुकानदार : सोशल मीडियासाठी पोस्ट तयार करा, ग्राहकांशी संवाद साधा, चॅटजीपीटीकडून जाहिरात मजकूर तयार करून घ्या. दुकानाची जाहिरात, सुसंवाद या सर्व गोष्टींसाठी एआय तुम्हाला मदत करू शकतो.

नोकरी करणारे : एक्सेलमध्ये गणितं, वर्डमध्ये ईमेल ड्राफ्ट - सगळं एआयचं काम आहे. एआय कॉम्प्युटर प्रोग्रॅमदेखील लिहू शकतो.

हे शिकायचं कसं? भीती वाटून घेऊ नका. युट्यूबवर मराठीत हजारो शिकवणारे व्हीडिओ आहेत. गुगलचे मोफत कोर्सेस, चॅटजीपीटी वापरून स्वतःच सराव, Canva वापरत डिझाइन शिकणं - हे सगळं "तुमच्या मोबाइलवरून" शक्य आहे.

थोडं सावधपणा गरजेचा आहे, एआय आपल्या जागा घेणार नाही, पण आपले विचार करणे थोडे कमी करू शकते - जर आपण त्यावर अंधपणे विसंबला असाल तर. खोटी माहिती, बनावट फोटो (deepfake), गोपनीय माहितीचा गैरवापर - याची जाणीव असायलाच हवी. आपण वापरणार, पण विचारपूर्वक!

सुनिश्चितपणे एआय आपल्या भविष्याचे कायापालट करणार आहे. घरबसल्या वैद्यकीय सल्ला मिळेल. अनेक वैद्यकीय उपकरणांद्वारे व्यक्तीच्या शारीरिक परिस्थितीची माहिती अचूकपणे विश्लेषण करून एआय उपायही सुचवेल. शाळांमध्ये प्रत्येक मुलाच्या कुवती व आवडीनुसार त्याच्यासाठी पाठ्यक्रम बनवून अभ्यास घेता येईल. वृद्ध व्यक्तींना साथ मिळेल - वेळेवर औषधं घेण्यासाठी आठवण करणे, बँकेच्या कामामध्ये मदत करणे किंवा इतर जीवनावश्यक व महत्त्वपूर्ण माहिती पुरविणे. हे सगळं एआयमुळे शक्य होणार आहे, पण हे सगळं त्यांच्यासाठी असेल जे आजपासून त्याचा वापर शिकतील. एकच गोष्टं लक्षात ठेवा-एआय माणूस नाही, पण माणसाला अधिक माणूस बनवू शकतो. एआय ही एक "मदतनीस" आहे -"मालक" नव्हे. तो तुमच्या कल्पकतेला हातभार लावतो.

तुमच्या वेळेला किंमत देतो आणि तुमच्या जगण्याला थोडं अधिक सोपं बनवतो. तर मग उगाच घाबरून नका राहू - आजपासून एआयशी मैत्री करा. कारण हे भविष्य तुमच्याही हातात आहे.

# 'इधर तो जल्दी जल्दी हैं...'





नॉस्टॅल्जिया

**श्रीनिवास बेलसरे**

गझल हा काव्यप्रकार लोकप्रिय करण्यात जगजीत सिंग आणि चित्रा सिंग या जोडीचे योगदान फार मोठे होते. त्यांची आज लोकप्रिय असलेली अनेक गाणी केवळ त्यांच्या समकालीन गझलकारांचीच नव्हती, तर ती अनेक दशके आधी होऊन गेलेल्या अभिजात उर्दू कवींचीही होती. त्यांनी काही शायर तर इंग्रजांच्या राजवटीत होऊन गेलेले निवडले. मात्र अभिजात उर्दू साहित्याचा तो खजिना काही उर्दू भाषिकांच्या उर्दू लिपीच्या आग्रहामुळे इतर रसिकांपर्यंत पोहोचत नव्हता. जगजीतजींनी तो एका वेगळ्याच मार्गाने सर्वांसाठी खुला केला.

चित्रा सिंग, जगजीत सिंग या युगुलाने त्या गझला त्यांच्या खास शैलीत गायल्यामुळे त्यातली साहित्यिक संपदा उर्दू न येणाऱ्या अगणित रसिकांना कळाली. त्या रचना श्राव्य झाल्यामुळे त्या वाचण्याची, त्यासाठी उर्दूची लिपी शिकण्याची, गरज उरली नाही आणि अगदी तरल पातळीवरची रोमँटिक उर्दू कविता सहज लोकांपर्यंत सहज पोहोचली. जुन्या शायरांच्या उत्तम रचना लोकांसमोर आणल्यामुळे इतर भाषिक लोकही उर्दू शिकू लागले. वाचकवर्गात विक्रमी वाढ होण्याची शक्यता दिसल्यामुळे ते साहित्य देवनागरी लिपीतही छापले जाऊ लागले. हा अर्थशास्त्राने मानसशास्त्रावर मिळवलेला विजय होता आणि आनंदाची बाब म्हणजे तो एकंदर भारतीय साहित्याच्या हिताचा होता. उर्दू गझलेच्या खूबसुरत चेहऱ्यावरचा तो अपरिचित लिपीचा पडदा जगजीत सिंग यांनी नकळत बाजूला केला.

जगजीतजींनी गायलेली एक गझल होती आजपासून तब्बल १९६ वर्षांपूर्वी जन्माला आलेल्या अमीर मीनाई यांची. ती सुद्धा अशाच शब्दांनी सुरू झाली होती. देशभर अतिशय लोकप्रिय असलेल्या त्या गझलेचे शब्द होते -

**"सरकती जाये है**
**रुखसे नकाब आहिस्ता आहिस्ता,**
**निकलता आ रहा है**
**आफताब आहिस्ता आहिस्ता."**

'अमीर मीना लखनवी' यांचा जन्म १८२९ सालचा. ते गझला आणि प्रामुख्याने नाती लिहीत. 'नात' म्हणजे पैगंबरसाहेबांच्या किंवा परमेश्वराच्या स्तुतीचे काव्य. हा काव्यप्रकार उर्दूत पसरविण्याचे त्यांचे योगदान मोठे मानले जाते. त्यांनी उर्दू, अरबी आणि पारसीमध्ये रचना केल्या. प्रसिद्ध शायर दाग दहलवी, मुहम्मद इक्बाल आणि खुद्द मिर्झा गालिब यांनी अमीरसाहेबांचा सत्कार केला होता. अलीकडे त्यांच्या आगळ्या शैलीच्या लिहिलेल्या 'नात' पाकिस्तानी गायक नुसरत फतेह अली, कव्वाल बहाउद्दीन खान यांनी गायल्या आहेत, तर त्यांच्या गझला गाणाऱ्यात होते जगजीत सिंग, गुलाम अली, उस्ताद बरकत अली खान, फरीदा खानम आणि कविता सेठ.

अमीरसाहेब त्यांच्या प्रेयसीच्या चेहऱ्याचे वर्णन या गझलेत कसे करताहेत, पाहा. 'तिच्या चेहऱ्यावरचा नकाब ती बाजूला करू पाहते आहे, पण मला मात्र असा भास होतोय की, जणू ढगाच्या मागून सूर्य हळूहळू उगवून वर येतो आहे.'

कवीचे आणि त्याच्या प्रेयसीचे हे प्रेम बरेच जुने असावे. कारण ते दोघे एकमेकाला लहानपणापासून ओळखतात असे कवी सांगतो आहे. पण त्याची प्रेयसीबद्दलची एक खट्याळ तक्रार आहे. तो म्हणतो, तारुण्यात पदार्पण करताच तिची वागणूक किती बदलली पाहा! जसे आम्ही यौवनात आलो तिने तर माझ्यापासून पडदा पाळणेच सुरू केले! खरे तर आम्ही बरोबरच्या वयाचेच होतो ना. दोघांचा तारुण्यातला प्रवेश बरोबरच झाला. तिचे यौवन कसे हळूहळू खुलत गेले, पण तिची ही लाजण्याची सवय मात्र किती झटकन सुरू झाली!

**'जवाँ होने लगे जब**
**वो तो हमसे कर लिया परदा,**



**हया यकलख्त आई और**
**शबाब आहिस्ता आहिस्ता.'**

ती मला चक्क टाळूच लागली. तिच्या या अचानक आलेल्या लाजाळूपणामुळे आमची भेट तर सोडाच मला साधे तिचा सुंदर चेहरा पाहणेही दुरापास्त होऊन बसले. तिचे दर्शन न झाल्याने मला रात्ररात्र झोपही येत नाही. त्यामुळे आज मी तिच्यापासून दूर आलोय. आजची रात्र माझ्यासाठी तिच्या ताटातुटीची, असह्य विरहाची रात्र ठरते आहे. मी या रात्रीत क्षणभरही झोपू शकलेलो नाही.' कवी इस्लामिक संस्कृतीत वाढलेले असल्याने त्यांचा देवदूत, जिन्न यावर पक्का विश्वास आहे. मग प्रेयसीच्या विरहाने व्याकूळ झालेले रात्रभर जागलेले कविवर्य देवदुतांना विनंती करतात. 'बाबांनो, माझ्या कर्माची झाडाझडती, माझे काय चुकले तिचे काय चुकले हे लगेच विचारू नका. ते सगळे आपण नंतर पाहूयात! आता नका माझा अजून छळ करू. सकाळ झाली असली तरी मला आता तरी झोपू द्या. जेव्हा वेळ असेल, फुर्सत असेल तेव्हाच आपण तो हिशोब करू!

**'शब-ए-फुर्कतका जागा हूँ**
**फरिश्तों अब तो सोने दो,**
**कभी फुर्सतमें कर लेना हिसाब,**
**आहिस्ता आहिस्ता.'**

कवीला मधेच आठवते जेव्हा आपण तिला भेटीविषयी विचारले होते तेव्हा ती किती घाबरली होती. कुणीतरी (शत्रू) ऐकेल या भीतीने तिने किती संकोचून दबक्या आवाजात हळूहळू उत्तर दिले होते -

**'सवाल-ए-वस्लपे उनको**
**अदूका खौफ है इतना,**
**दबे होंठों से देते हैं**
**जवाब आहिस्ता आहिस्ता.'**

विरहात असताना प्रियकराच्या मनात अनेक विचार येत असतात. आपली ताटातूट कशामुळे झाली असावी? कशामुळे इतके छान फुललेले आपले प्रेम शेवटी आटले? एकदा त्याला असेही वाटून जाते की, आपण उगाचच इतकी घाई केली! कदाचित माझ्या घाई करण्याच्या स्वभावानेच तर घात केला नसावा? तिचा स्वभाव किती लाजराबुजरा आहे, हळवा आहे, हे मी लक्षातच घेतले नाही का? अरेरे! मग कवी प्रेमिकेला उद्देशून अगदी सौम्यपणे तिची तक्रार करताना म्हणतो -

**'हमारे और तुम्हारे प्यार में बस फर्क है इतना,**
**इधर तो जल्दी-जल्दी है, उधर आहिस्ता**
**आहिस्ता.'**

उर्दू शायरी ज्या संस्कृतीत जन्मली तिथे शीर कलम करणे, मृत्यूदंड देणे हे अगदी सामान्य आहे. त्या पार्श्वभूमीवर कवी सरळ अशी कल्पना करू लागतो की, मला शिक्षा द्यायची म्हणून ती कदाचित माझा 'कत्ल'च करून टाकेल, पण त्यातही हा रोमँटिक वल्ली काय म्हणतो पाहा, 'तिला मला शिक्षाच द्यायची असेल, तर तिने कठोरपणे माझे शिरसुद्धा धडावेगळे करावे, पण कृपा करून ते एकाच झटक्यात नको! उलट माझी तिला विनंती असेल, "राणीसाहेब, हळू, जरा हळू, थोडे सावकाशच चिरा मला!"

**'वो बेदर्दीसे सर काटें 'अमीर'**
**और मैं कहूँ उनसे,**
**हुजूर आहिस्ता आहिस्ता जनाब**
**आहिस्ता आहिस्ता.'**

कसले हे कलंदर कवी आणि अगदी प्रेयसीलासुद्धा कसल्या यांच्या विचित्र विनंत्या! अफलातून प्रेमाचा हा असला बेछूट व्यवहार पाहण्यासाठी उर्दू गझला, कव्वाल्या ऐकण्याला पर्याय नाही हेच खरे!

**(२६ जून कालिदास दिनाच्या निमित्ताने...)**






विशेष

**लता गुठे**

संस्कृत साहित्यातील सर्वोत्कृष्ट काव्यांमध्ये 'मेघदूत' हे कालिदासाचे एक अमर काव्य मानले जाते. मेघदूत ही केवळ एक काव्यकृती नसून ती प्रेम, विरह, निसर्ग आणि सौंदर्य यांच्या अभिव्यक्तीची सर्वोच्च शब्दसंहिता आहे असे मला वाटते. या काव्याच्या माध्यमातून कालिदासाने दूतकाव्य या प्रकाराची निर्मिती केली. हे एक खंडकाव्य असून यामध्ये एक यक्ष मेघाला आपला दूत बनवून आपल्या पत्नीला निरोप पाठवतो, ही कल्पना आहे.

मला समजलेल्या या श्लोकाचा अर्थ आणि त्यावरून कवी श्रेष्ठ कालिदास यांच्याविषयी माहिती आपल्यापर्यंत पोहोचवावी वाटली...

**आषाढस्य प्रथम दिवसे**
**मेघमाश्लिष्टसानुं**
**वप्रक्रीडपरीतदिशं**
**स्पोर्टयन्तं रसालम्।**
**गन्तुं वाञ्छत्येष पवनपथात्रयित्वा**
**सद्यः खिन्नं श्रवणकठिनं वर्तते**
**तस्य चित्तम्॥**

**श्लोकाचा अर्थ** – आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी, पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या मेघाला आलिंगन देऊन, रसाळ वृक्षांना स्पर्श करत, वाऱ्याच्या मार्गाने जाण्याची इच्छा असलेला यक्ष, आपल्या खिन्न आणि कानी कठोर वाटणाऱ्या अंतःकरणाने व्याकूळ झाला आहे. का व्याकुळ झाला आहे तर? आषाढ महिन्यातील दाटून आलेले ढग, पावसाच्या सरी, सुंदर वातावरण या वातावरणामध्ये कशाला त्याच्या प्रेयसीची सखीची आठवण होते आणि त्या आठवणीने तो व्याकुळ होतो अशा वेळेला तो मेघालाच आपला दूत बनवून दूर असलेल्या प्रिय सखीकडे निरोप पाठवतो... या छोट्याशा एका घटनेवर आधारलेले हे मेघदूत महाकाव्य अतिशय रोमांचकारी असे आहे. यक्ष मेघाकडे संदेश पाठवतो तेव्हा मेघ त्याला विचारतो, तुझ्या प्रियेला मी ओळखत नाही मग हा संदेश मी कोणाला देऊ? त्यावेळेला यक्ष तिचे वर्णन करतो...

**मेघदुताच्या कथानकाचा सारांशः** मेघदूत हे दोन भागांमध्ये विभागले आहे. पूर्वमेघ आणि उत्तरमेघ. यामध्ये जो यक्ष आहे, तो कुबेराचा सेवक आहे, त्याने आपले कर्तव्यपालन न केल्यामुळे एक वर्ष हिमालयातील रामगिरी पर्वतावर निर्वासित होण्याची शिक्षा मिळते. तिथे राहून त्याचे मन आपल्यापासून दूर असलेल्या पत्नीच्या आठवणींमध्ये रमते. आषाढ महिन्यातल्या पहिल्या दिवशी आकाशात भरून आलेले मेघ दिसतात आणि त्याच क्षणी यक्षाच्या मनात विचार येतो-"या मेघाला दूत बनवून मी माझ्या पत्नीला संदेश का पाठवू शकतो?"

त्यांच्यामध्ये काय बरं संवाद झाला असेल?

माझ्या कल्पनेतून या संवादाची मी निर्मिती केली आहे ती अशी...

हिरव्यागार वनराईने नटलेला रामगिरी पर्वत. आजूबाजूला विविध रंगी फुलांनी नटलेल्या वेली आहेत. पाऊस येण्याचे चिन्ह दिसत आहे. वारा पावसाचा निरोप घेऊन आला आहे. घरट्यातील पक्षांचा किलबिलाट सुरू आहे... याकडे या यक्षाचे अजिबात लक्ष नाही, तो एका दगडावर बसून आकशाकडे पाहत आहे...

यक्ष स्वतःशीच बोलत आहे... 'कशी असेल माझी प्रिया? तिलाही माझी आठवण येत असेल का? ही विरह यातना किती विलक्षण आहे. तिच्या आठवणी मला दिवस-रात्र व्याकुळ करतात. माझी ही अवस्था तिला कळत असेल का? काय करू काही सुचत नाही... आज या काळ्या सावळ्या मेघांमध्येच का बरं मला तिचा भास होत आहे.'

त्याच्या मनातील हे विचार त्याला अधीर करतात आणि आकाशाकडे पाहून तो हात जोडून ढगाला विनंती करतो, ''हे मेघराज, फक्त आता तूच माझी मदत करू शकतोस. माझा संदेश घेऊन माझ्या प्रियेकडे गेलास, तर माझ्यावर खूप उपकार होतील." त्याच क्षणी एक ढग यक्षाच्या समोर येऊन उभा राहतो...

"हे मेघराजा, तू या आषाढमासात माझ्यासमोर प्रकट झालास, म्हणजे हा नुसता योगायोग नाही. तूच माझ्या भावनांचा वाहक व्हावास अशी मी तुला विनंती करतो हे मान्य करशील?"

" हो मी तुझी मदत करायला तयार आहे. सांग तुझा संदेश काय आहे तो..."

" हे मेघराज, माझ्या प्रिय सखीकडे जा. ती अलकानगरीत राहते. तिला माझा संदेश दे. ती माझ्यासारखी विरहानी व्याकूळ होऊन माझी वाट पाहत असेल. मृगनयनी माझी प्रिया तिच्या डोळ्यांत माझ्या आठवणींत व्याकुळत असेल."

"मी तुझ्या भावना समजू शकतो, पण माझ्याकडे शब्द नाहीत. तुझा संदेश मला दे. मी तो घेऊन जातो; परंतु मला तुझी अलकानगरी माहीत नाही. तिचे जर वर्णन तू केलेस तर मी तिथे पोहोचू शकेन.''

"थांब, मी तुला मार्ग सांगतो त्याप्रमाणे तू जा. पुढे गेलास की नर्मदा नदीचे पात्र लागेल. त्यानंतर विंध्य पर्वत असेल तो ओलांडून पुढे गेलास की, उज्जैन, माळवा, चंबळ आणि पुढे हिमालय ओलांडत अलकानगरी. माझी नगरी आहे तिथे. माझी प्रिय सखी यक्षिणी राहते. तू आकाश मार्गाने जाताना तुझ्या सौंदर्याने सारा परिसर आल्हादित होईल. माझी प्रिया दिसली की, तिला हा संदेश दे, (एका मोठ्या वृक्षाच्या पानावर यक्ष काही ओळी लिहितो आणि मेघाला वाचून दाखवतो... तिला सांग, माझ्या हृदयात अजूनही तुझ्याच आठवणी आहेत. तुझ्याशिवाय मला क्षणभरही चैन पडत नाही. तिच्या सहवासातील मधूर आठवणी माझ्याजवळ आहेत. त्या आठवणीवरच माझं हे वर्ष संपेल आणि मी लवकरच तुला भेटायला येईल. तुझ्या सौंदर्याची मोहिनी आजही माझ्या मनात आहे.

हे मेघराजा. माझ्या प्रेयसीकडे हे पत्र घेऊन जा आणि निघताना तिला आवर्जून सांग... की जरी मी दूर असलो, तरी प्रत्येक क्षणी मी तिच्याच सोबत आहे."

यक्षाचा संदेश घेऊन मेघ जातो आणि त्याचे 'मेघदूत' हे महाकाव्य तयार होते, हे फक्त एक प्रेमकाव्य नाही; तर ते कालिदासाच्या कल्पनाशक्तीचे शिखर आहे, असे मला वाटते. हे महाकाव्य प्रत्येक विराहानी व्याकूळ झालेल्या स्त्री-पुरुषाचे प्रतिनिधित्व करते. कालिदास हे शब्दप्रभू असल्यामुळे त्यांनी वर्णन केलेल्या या शब्दांच्या महाजाळामध्ये वाचक अडकून पडतो. अनेक भाषांमध्ये झालेले अनुवाद हे अनेक कवींच्या प्रतिभेला ......अवाहच होते. संस्कृत विषयाची उत्तम जाण असलेल्या शांता शेळके यांनी मेघदुताचा खूप सुरेख मराठी अनुवाद केला आहे. हा पद्य अनुवाद म्हणजे, मेघदूत महाकाव्याचे एक अत्यंत प्रभावी व भावनापूर्ण रूप आहे. १९९४ साली हा अनुवाद केला, ज्यामध्ये त्यांनी 'पादाकुलका' या छंदाचा वापर करून संस्कृताच्या मूळ भाषासौंदर्याला मराठी रसात वाचकांच्या समोर उभे केले, म्हणून आमच्यासारख्या रसिक कवींना त्याचा आस्वाद घेता येतो. खरंतर मेघदूत हे आपल्या संस्कृतीचे एक अनमोल शब्द भांडार आहे.



# भविष्यातील ढासळती विवाह व्यवस्था...



**आरती बनसोडे**
**(मानसिक समुपदेशक, मुंबई)**

हल्ली काही घटना आपल्या बघण्यात ऐकण्यात येत आहेत की, ज्यामुळे भविष्यातील लग्न व्यवस्थेविषयी चिंता निर्माण झालेली आहे. काही घटनांमध्ये आपल्याला असे निर्दशनास येते की, नवरा बायकोचे भांडण झाल्यामुळे रागात नवऱ्याने बायकोला ठार मारून बाथरूममध्ये तिचा मृतदेह कोंडून ठेवला, तर काही घटनांमध्ये बायकोने हनिमूनला गेल्यानंतर नवऱ्याची सुपारी देऊन त्याचा खून केला. त्याचप्रमाणे अशाही घटना आपल्याला बघायला मिळाल्या की, जिथे संपूर्ण कुटुंबाने महिलेवर अत्याचार करून तिचा जीव घेतला. लग्नाला अवघे ३६ दिवस झालेले असताना नवरा आपल्या मनासारखा नाही हे लक्षात येताच महिलेने त्याच्या जेवणामध्ये विष कालवून त्याला ठार मारले त्याचप्रमाणे अशी एक घटना बघण्यात आली की, जिथे घरगुती किरकोळ वादातून नवऱ्याने बायकोचा जीव घेऊन स्वतःदेखील आत्महत्या केली.

एकंदरीत काय तर समाजामध्ये एक दृष्टिक्षेप टाकल्यास लक्षात येईल की, हल्ली लग्न व्यवस्थाही धोक्यात आलेली आहे. पूर्वी नवरा आणि बायको ही संसाराची दोन चाकं मानली जातं; परंतु हल्लीच्या पिढीला लग्नव्यवस्थेचं महत्त्व आणि गांभीर्य राहिलेलं नाही. पूर्वी एकमेकांच्या मनाची नातेवाइकांची, आपल्या कुटुंबाच्या मनाची काळजी घेत सामाजिक दडपणाखाली येऊन कुटुंब व्यवस्थाही व्यवस्थितपणे टिकत होती. नवरा-बायको दोघेही तडजोड करत ही व्यवस्था अधिकाधिक घट्ट बनवत होते; परंतु हल्लीच्या पिढीमध्ये तडजोड करणे किंवा समोरच्याच्या मनाचा विचार करणे हे कुठेच दिसून येत नाही. स्वार्थ, राग, चिडचिड, मनासारख्या गोष्टी न घडल्यास टोकाची भूमिका घेत दुसऱ्याचा जीव घेण्याइतपत हिंसक विचार हल्ली सगळीकडे पाहावयास मिळत आहे. हे असंच चित्र जर चालू राहिलं, तर भविष्यातील पिढी लग्न करण्यास उत्सुकता दाखवणार नाही.

पूर्वी महिला गृहिणी आर्थिक परावलंबित होत्या. हल्ली मुली सुशिक्षित झाल्या, स्वतःच्या पायावर उभ्या राहून त्या त्यांचा उदरनिर्वाह स्वतः करू शकतात. त्यामुळे त्यांच्या मानसिकतेमध्ये देखील बराच परिणाम झालेला आहे. पूर्वी १८ ते २४ वर्षे वयोगटातील मुलींची तर २५ ते २८ वयोगटातील मुलांशी लग्न होत असत; परंतु हल्ली आपली स्वप्न पूर्ण करण्यात आणि मनासारखा जोडीदार मिळवण्यात हे वय मुलींचे २८ नंतर तर मुलांचे ३०-३२ नंतर झालेले आहे आणि एवढ्या उशिरा लग्न झाल्यानंतर सर्व गोष्टींवर यांचा परिणाम होतो आणि त्यामुळे मानसिक बदल देखील घडून येतात. तडजोड करत संसार करण्याची वृत्ती कमी होत जाते आणि आयुष्य स्वतःभोवती फिरायला लागतं. आई-वडिलांचा हस्तक्षेप मुला-मुलींना मान्य नसतो, त्यातच विभक्त कुटुंबपद्धतीमुळे लग्न झालेल्या नवीन जोडप्यांवर कौटुंबिक जबाबदाऱ्या व बंधन नसतात. त्यामुळे दोघांमध्ये जरी काही कारणानिमित्त वाद झाले तरी ते वाद संपवण्यासाठी घरात वरिष्ठ मंडळींची उपस्थिती नसते. त्यामुळे हे वाद रागाच्या भरात आक्रमक रूप धारण करून एकमेकांचा जीव घेण्याचे प्रमाण वाढले आहे. अशा वेळेस पालकांनी मुला-मुलींना हस्तक्षेप वाटू नये अशा पद्धतीने त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या वैवाहिक आयुष्यामध्ये नक्की काय सुरू आहे याचा कानोसा घेतला, तरुण मंडळींनी देखील आपल्या मनातील घालमेल आई-वडिलांना सांगितली, तर नक्कीच घरातील वरिष्ठ मंडळी त्यात मधला मार्ग निवडून दोघांना आनंद कसा मिळेल यावर विचार करतील. यामुळे गोष्टी हाताबाहेर न जाता कदाचित वेळीच उपाय करणे सोपे जाईल. शिवाय मुला-मुलींनी शिक्षणाचा आणि आपल्या आर्थिक स्वावलंबनाचा दुरुपयोग-उपयोग करून गर्व न बाळगता, मनुष्य हा कुटुंबशील आणि समाजशील प्राणी आहे. हे मान्य करून सामाजिक भान जपून कुटुंबात मन रमवले पाहिजे. हल्ली चाळीशी-पन्नाशीमधील पालक स्वातंत्र्याच्या नावाखाली, मध्यमवयीन आयुष्य जगल्यानंतर उरलेल्या आयुष्याची मजा घेण्यासाठी सर्रास क्लब, डिस्को, पब या ठिकाणी जातात, विवाहबाह्य संबंध देखील प्रचंड प्रमाणात वाढीस आलेले दिसून येत आहे. याचे अवलंबन व अनुकरण आपली पुढील पिढीदेखील करत आहे.

कुटुंब व्यवस्थेबद्दलचे संस्कार लहानपणापासून घराघरातून त्यांच्यात रुजवणे गरजेचे आहे. पालकांनी मुलं लहान असताना आपापसामधील वाद मुलांसमोर न येऊ देता कौटुंबिक सामंजस्याने मुलांचे संगोपन केल्यास मुलांमध्ये कुटुंब आणि विवाह व्यवस्थेविषयी त्या पद्धतीचे संस्कार रोवण्यास मदत होईल.

# बेलगाम गोपीचंद पडळकरवर गुन्हा दाखल करा

**आक्रमक : राहुरीत ख्रिस्ती समाजांचे निवेदन**



पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी:ख्रिस्ती समाजा विषयी अपमानास्पद शब्द वापरून ख्रिस्ती धर्मगुरूंना जिवे मारण्याची धमकी देणारे, आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांची आमदारकी रद्द करण्यात यावी. या मागणीसाठी राहुरी येथील समस्त ख्रिस्ती बांधवांच्या वतीने महसूल व पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. राहुरी येथील समस्त ख्रिस्ती बांधवांच्या वतीने तहसीलदार नामदेव पाटील व सहाय्यक पोलिस निरीक्षक अमोल पवार यांना आज दि. २३ जून २०२५ रोजी निवेदन देण्यात आले.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, सांगली जिल्ह्यात मिरज तालुक्यातील कुपवाड येथील स्व. ऋतुजा राजगे यांनी दि. ६ जून २०२५ रोजी आत्महत्या केली. त्यांच्या मृत्यु प्रकरणी सीआयडी चौकशी करून त्यांच्या आत्महत्तेचे गुढ उघड व्हावे व स्व. ऋतुजा राजगे यांना न्याय मिळावा. स्व. ऋतुजा राजगे यांच्या आत्महत्ते नंतर सांगली येथील सभेत आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिस्ती धर्मा विषयी काही अपमानास्पद वक्तव्य केले आणि ख्रिस्ती धर्मगुरू हे धर्म परिवर्तन करतात. या गावात जो धर्मगुरु येईल त्याला ठोकून काढा, त्याला ५ लाख रुपये, याच प्रमाणे २ ठोकणाऱ्याला ४ लाख, अश्या पद्धतीने, ख्रिस्त धर्म गुरूंना जीवे सैराट पद्धतीने जीवे मारल्यास ११ लाख रक्कमेचे बक्षीस जाहीर केले.

एका संविधानिक पदी असणाऱ्या व्यक्तीने अशी भाषा करून समस्त ख्रिस्ती धर्म गुरूंच्या जीविताला धोका निर्माण करून दिला आहे.त्यामुळे पोलीस निरीक्षकांनी राहुरी हद्दीतील सर्व ख्रिस्ती बांधव व ख्रिस्ती धर्मगुरुंना संरक्षण मिळवून द्यावे. या पुढे कोणत्याही धर्मगुरू, पास्टर, ख्रिस्ती बांधव यांना शारीरिक, जीवित आणि मानसिक हानी झाल्यास या प्रकरणी काठोर कारवाई व्हावी. तसेच त्याकरिता आमदार पडळकर व समवैचारिक व्यक्ती किंवा संघटना या कारणीभूत राहतील.

तसेच पडळकर यांनी ख्रिस्ती समाज व ख्रिस्ती धर्मगुरु यांच्या विषयी केलेले वक्तव्य हे अपमानास्पद आहे. आणि एक संविधानिक पदी असणाऱ्या व्यक्तीने अश्या प्रकारे भाष्य करून जातीयभेद करून समाजात तेढ निर्माण करत आहे. जातीय तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्ती किंवा समुहा विरुद्ध कार्यवाही करुन गुन्हा दाखल करावाख्रिस्ती समाज हा शांतता प्रिय समाज आहे. ख्रिस्ती समाजात कोणत्याही प्रकारचे धर्म परीवर्तन करून घेतले जात नाही किंवा प्रवृत्त केले जात नाही. तरीही काही कट्टर पंथीय संघटना कडून ख्रिस्ती समाजातील बांधवांना आणि ख्रिस्ती धर्मगुरू, पास्टर, ब्रदर यांना मानसिक, शारिक, त्रास देण्यात येत आहे. सदर निवेदनाची दखल घेऊन दोन समाजात तेढ निर्माण करणारे आमदार पडळकर यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सकल ख्रिस्ती समाजाच्या वतीने करण्यात येते. दिलेल्या निवेदनावर बिशप मॅन्युएल गायकवाड, रेव्हरंड पास्टर सॅम्युअल साळवे, पास्टर सतिष नन्नवरे, सरोदे, प्रविण शिंदे, बोर्डे, दोंदे, प्रदिप हिवाळे, हर्षल गुप्ता, कैलास साळवे, बबलू हिवाळे, निलेश पंडित, शशिकांत साळवे, कांता गुप्ता, सुशिला कदम, सौ. गायकवाड आदिंच्या सह्या आहेत. एका संविधानिक पदी असणाऱ्या व्यक्तीने अशी भाषा करून समस्त ख्रिस्ती धर्म गुरूंच्या जीविताला धोका निर्माण करून दिला आहे.त्यामुळे पोलीस निरीक्षकांनी राहुरी हद्दीतील सर्व ख्रिस्ती बांधव व ख्रिस्ती धर्मगुरुंना संरक्षण मिळवून द्यावे.

## नाथापूर-पंढरपूर पायी दिंडी

**अध्यात्मिक:भविक-भक्त दिंडीत सहभागी**

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:नाथापूर ते पंढरपूर पायी दिंडीचे आज प्रस्थान होणार बीड तालुक्यातील नाथापूर परिसरातील श्रद्धास्थान भाविक भक्ताचे आधारस्तंभ श्री क्षेत्र जुने गाव हनुमान मंदिर ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा आज सकाळी दहा वाजता निघणार असून दिंडीचे हे पहिलेच वर्ष आहे . दिंडीचा मार्ग घाटसावळी, बोरफडी, चाकरवाडी, पिपळगाव, तालुका वाशी, बाळूमामा संस्थान आवरा तालुका भूम, महेश गाव तालुका माढा लोळ, पेट्रोल पंप तालुका कुर्डवाडी मार्गे बाबळगाव वस्ती तालुका पंढरपूर असून अंदाजे एकूण प्रवास १८५ किलोमीटरचा असून दररोज सकाळी नाष्टा,दुपारचे जेवण संध्याकाळी ची जेवणाची सोय मुक्कामाची सोय सयोजकांनी केली असून या परिसरातील लोकांनी यामध्ये सक्रिय भाग घेतला असून या दिडीमध्ये भाविक भक्ताने



सहभागी व्हावे असे श्रीक्षेत्र जुने गाव हनुमान मंदिर व दिंडीचे मुख्य प्रवर्तक श्री दामोदर चव्हाण त्यांचे सहकारी एकनाथ उनवणे श्री राधेश्याम चव्हाण यांनी असे आवाहन केले आहे .यावेळी दिंडी मार्गस्थ करण्यासाठी गावातील सर्व नागरिक हजर होते. दरम्यान दरवर्षी राज्याच्या कानाकोपऱ्यातून वारकरी पंढरपूर येथे दर्शनासाठी येतात. पांडुरंगाच्या जयघोषात अनेक पायी दिंडी पाऊस, वादळ, वारा याची चिंता न करता विठ्ठलाच्या दर्शनासाठी एकवटतात.

## गरिबीतून प्रगतीकडे वाटचाल

**दुवा:लोणारमध्ये शेख महोम्मद यांचा सत्कार**



पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:गरिबीतून संघर्ष करत प्रामाणिक मेहनतीच्या बळावर उभारी घेणारे शेख मोहम्मद शेख गफूर, त्यांची पत्नी खातून बी शेख मोहम्मद आणि सुपुत्र शेख रऊफ ऊर्फ लाला हे तिघे जण पवित्र उमरा यात्रेसाठी मक्का-मदिना येथे काल लोणारहून रवाना झाले. एकेकाळी आर्थिकदृष्ट्या कठीण परिस्थितीतून मार्ग काढलेले शेख मोहम्मद आज आपल्या कुटुंबासह अल्लाहच्या घरात जायला निघाले, ही गोष्ट लोणार शहरासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.या पवित्र यात्रेच्या निमित्ताने मो. तौफिक कुरेशी (मा.बांधकाम सभापती तथा अध्यक्ष,लोणार तालुका काँग्रेस अल्पसंख्यक ) यांच्या निवासस्थानी सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी शहरातील अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाल, श्रीफळ, टोपी देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला आणि अल्लाह त्यांच्या उमरा यात्रेला कबूल करो, अशा शुभेच्छा व दुवा देण्यात आल्या.यावेळी मा. सरपंच हाजी अब्दुल लतीफ कुरेशी, मो. तौफिक कुरेशी (आयोजक), आसिफ सर, जावेद कुरेशी, शेख करामात शेख गुलाब (मा. नगरसेवक), अज़ीम चौधरी, मेकॅनिक रियाज़ कुरेशी, तौसीफ कुरेशी (शहराध्यक्ष युवक काँग्रेस), शेख महबूब शेख मोहम्मद, सय्यद सलाम सय्यद गनी, शेख रऊफ शेख भूखान, सय्यद अकबर सय्यद बाबा, शेख वजूदिन शेख शमशोदिन, शेख गफ्फार, **पान दोन...**

## तूळसाबाई जंजिरेंचे निधन

पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:आष्टी तालुक्यातील कुंभेफळ येथील श्रीमती तुळसाबाई रावसाहेब जंजिरे यांचे वृद्धापकाळाने रविवारी सकाळी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांच्या (वय-९२) होते.दिवंगत श्रीमती जंजीरे यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. रविवारी दुपारी त्यांच्यावर गावी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. इंजिनीयर तानाजी जंजिरे यांच्या त्या मोठ्या वहिनी होत. दरम्यान तुळसाबाई जंजिरे यांचा स्वभाव अतिशय मनमिळावू होता. त्यांचा निधनाने जंजिरे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दैनिक पुण्यभूमी जंजिरे कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

## आरोग्यासाठी नियमित योगा आवश्यक

**विनायक रत्नपारखी: सक्सेस पब्लिक स्कुलमध्ये योगा**



पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:जागतिक योग दिनाचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात २१ जून जागतिक योग दिवस म्हणून भारतभर सर्वत्र साजरा होत आहे त्याचाच एक भाग म्हणून माजलगाव येथे लोकनेत्या नामदार पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेवरून व जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सक्सेस पब्लिक स्कूलमध्ये भारतीय जनता पार्टी माजलगाव शहर मंडळ व पात्रुड मंडळाच्यावतीने जागतिक योग दिनानिमित्त योग शिबीरात विविध योगासने व प्राणायाम घेऊन योग शिबीर संपन्न झाले. भारत मातेचे प्रतिमा पूजन करून योग प्रशिक्षक नंदकुमार शिंदे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी प्रस्ताविक पर मनोगत व्यक्त करताना माजलगाव भाजपा शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी म्हणाले आजच्या धकाधकीच्या व स्पर्धेच्या युगामध्ये आपण स्वतःच्या शरीरासाठी वेळ देत नसल्यामुळे आपल्याला अनेक आजाराला सामोरे जावे लागते ,आज आपण सर्वजण मानसिक व शारीरिकदृष्ट्या कणखर व मजबूत असलेच पाहिजे, यासाठी योगा व प्राणायाम हाच प्रभावी उपाय आहे. योग दिनाच्यानिमित्त आपण सर्वांनी योगाभ्यासाचे महत्त्व ओळखून आज पासून दररोज दिवसातून काही वेळ योगाकरीता देण्याचा निश्चय संकल्प प्रत्येकाने योग दिनाच्या निमित्त करू. योग प्रशिक्षक नंदकुमार शिंदे महेश आगे यांनी रोज नियमित योगा केल्याने काय फायदा होतो त्याचबरोबर सूर्यनमस्कार व विविध प्राणायामाची माहिती देत योगासने करून दाखवले. याप्रसंगी पवन मोगरेकर यांनी देखील योग दिनाचे महत्त्व विस्तृतपणे सांगितले. या योगदिनाच्या निमित्त भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ प्रशांत पाटील मा नगराध्यक्ष डॉ.अशोक तिडके, पात्रुड मंडळाध्यक्ष डॉ.अभिजीत सोळंके ज्ञानेश्वर माऊली सरवदे ईश्वर खुरपे अविनाश कानडे बाळासाहेब साळवे दत्ता महाजन डॉ सचिन देशमुख प्रल्हाद दळवि बाळासाहेब क्षिरसागर आनंद कुलकर्णी सिद्धेश्वर राठोड मनोज कोरडे विकास

## पेरणीच्या तोंडावर शेतकरी हवालदिल

**नारायण गोले: अन्यथा शेकाप करणार हलगी बजावो आंदोलन**



पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:तालुक्यातील शेतकरी पेरणीच्या तोंडावर आर्थिक संकटात सापडलेला असून हवालदिल झाला आहे तर दुबार पेरणीचे संकट समोर उभे असतानाही रूपा माता गुऱ्हाळा कडून सहा महिन्यापासून शेतकऱ्याच्या उसाचे पैसे थकीत असल्याने शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून माजलगाव तालुक्यातील प्रत्येक वर्षी हीच रित असून सहा सहा महिने वर्ष वर्ष शेतकऱ्यांना उसाच्या पैशासाठी उंबरठे शिजवायला लावणाऱ्या रूपामाता कारखान्याच्या संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल करून गुराळाच्या जमिनीसह गुऱ्हाळाचा लिलाव करून शेतकऱ्याचे पैसे अदा करावेत अशी मागणी शेकापच्या वतीने उपजिल्हाधिकारी माजलगाव यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की,रोषनपुरी येथील रुपामाता गुर्हाळाकडुन प्रत्येक वर्षी सुरुवातीच्या पंधरा दिवसाचे बिले दिली जातात त्यानंतर शेतकऱ्यांना बिलासाठी सहा महिने गुर्हाळाचे उंबरठे झिजवावे लागतात. ऐन पेरणीच्या तोंडावर व दुबार पेरणीचे संकट घोंगावत असतांनाही रूपामाता गुराळ शेतकऱ्यांचे ऊस बीलाची रक्कम देण्यास तयार नाही. शेतकऱ्यांचे थकीत बिलाची रक्कम तात्काळ द्यावी यासाठी शेकापच्या वतीने उपजिल्हाधिकारी कार्यालयावर दि.२४ जुन मंगळवार रोजी हलगी बजावो आंदोलन करण्यात येणार असुन प्रशासनातील अधिकारी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करतात पण कठोर कारवाईचे पाऊल उचलत नाहीत ही बाब शेतकरी कामगार पक्ष कदापिही खपवून घेणार नाही तर गुर्हाळाच्या संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल करुन गुर्हाळाची जप्ती करण्यात यावी व त्याचा **पान दोन...**

## ...अन्यथा अर्धनग्न आंदोलन छेडणार

**सय्यद निसार अली:बेकायदेशीर काम ;गुन्हा दाखल करा**



पुण्यभूमी प्रतिनिधी

आष्टी:तालुक्यातील कडा येथील जमीन सर्व्हे नं. १९०,१९१,१९२, १९३,१९४,१९५ व ३७२,३७३ बाबतचा फेरफार क्र.१५४३, १५४२ हा बेकायदेशीर मार्गाने कायम मंजूर केल्यामुळे तात्कालीन तलाठी व मंडळ अधिकारी नवनाथ देवराव औंदकर व मंडळ अधिकारी घोडके पी.वी. यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात यावी, कडा येथील रहिवासी असून कडा येथील सर्व्हे नं. १९०,१११, १९२, १९३, ११४, १९५ व ३७२, ३७३ मध्ये जमीन आहे. हे सर्व्हे नंबर आमच्या वैयक्तिक मालकीचे आहेत. त्या नागनाथ देवस्थान, मौलाली पीरसाहेब मौजे कडा येथील देवस्थानाच्या नाहीत.असे असतानाही केवळ शेख ताहेर हनिफ याांच्या अर्जावर मा. उपविभागीय अधिकारी साहेब पाटोदा यांनी दिनांक २७/१०/२०२२ रोजी फेरफार क्र. १५४३ व १५४२ कायम करण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत आम्ही मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडे अपील दाखल केलेले आहे. प्रामुख्याने मा. उपविभागीय अधिकारी पाटोदा यांनी दि. २७/१०/२०२२ रोजी आदेश पारित केल्यानंतर मा. तहसिलदार साहेब आष्टी यांनी दि.३०/१२/२०२२ रोजी आदेश मंडळ अधिकारी कडा व तलाठी सज्जा कड़ा सदर आदेशची अंमलबजावणी करण्याकरता सूचित केले आहे. परंतू वास्तविक पाहता मा. तहसिलदार साहेब आष्टी यांचे पत्र निर्गमित होण्यापुर्वीच मनमानी पध्दतीने तलाठी साहेब यांनी **पान दोन...**

## लाडक्या बहिणींना कर्ज कधी?

**वर्षा शिंदे: शासनाला उपस्थित केला प्रश्न**



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा: महिलांच्या सशक्तीकरणासाठी सरकार मोठमोठ्या घोषणा करते, मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी केव्हा होणार? असा थेट सवाल सावता सेना महिला आघाडीच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षा सौ. वर्षा शिंदे यांनी उपस्थित केला आहे. ङ्गलाडकी बहिणफ योजनेच्या माध्यमातून महिलांना व्यवसायासाठी एक लाख रुपयांचे कर्ज देण्याची घोषणा करण्यात आली होती, पण अद्यापही अनेक महिलांना त्याचा लाभ मिळाल्याचे चित्र नाही, अशी टीका त्यांनी केली.

सरकार ङ्गलाडकी बहिणफ म्हणत महिलांना एक वेगळी ओळख देत आहे, हे स्वागतार्ह असले तरी त्या बहिणीला स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी जेव्हा आर्थिक मदतीची गरज असते, तेव्हा कर्जाच्या नावाखाली केवळ घोषणाच दिल्या जात आहेत, अशी खंत शिंदे यांनी व्यक्त केली.

त्यांनी सांगितले की, अनेक महिला अजूनही बँकांच्या दारात हेलपाटे घालत आहेत. अर्ज स्वीकारले जात नाहीत, अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ केली जाते. त्यामुळे ही योजना केवळ कागदावरच आहे की काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

**पान दोन...**

# दलालाकडून पंधरा बालकामगारांची सुटका

**दणका : नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल;जनावरांची राखण,शेण काढणे,धुणी भांडी आदी कामे करून घेतली**

पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:तालुक्यातील सेवालाल तांडा येथून पंधरा बालकामगारांची अहिल्यानगर कृती दलाकडून सुटका करण्यात आली. बालकामगारांकडून वेठबिगारी करून घेणाऱ्या नऊ जणांविरोधात अंभोरा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.आई-वडील कोळसा भट्टीवर कामासाठी जाहेरगावी असताना या जनावरांची राखण, शेण काढणे, धुणी भांडी यांसारखी कामे करून घेतली जात होती.शनिवार दि. २१ जून रोजी सकाळी अहिल्यानगर येथील जिल्हा कृती दलाने अचानक याठिकाणी छापा मारल्यामुळे हा प्रकार उघडकीस आला. या मुलांकडून मनाविरुद्ध कामे करून घेतली जात होती, सुटका केलेल्या मुलांची अंभोरा पोलिस ठाण्यात नोंद करून त्यांना बालकल्याण समितीसमोर हजर केले असता, समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे यांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे करत आहेत.



### बालपणातच मजुरी....

भारतातील अनेक भागांमध्ये आजही लहान मुले कामावर ठेवली जात आहेत. शिक्षणाचा हक्क असतानाही काही मुलांना बालपणातच मजुरी करावी लागते. या समस्येवर उपाय म्हणून सरकारने बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) कायदा, १९८६ लागू केला. यामध्ये वेळोवेळी सुधारणा करून १४ वर्षांखालील मुलांचे कोणत्याही प्रकारच्या कामात सहभाग घेणे बेकायदेशीर ठरवले आहे. परंतू असे असताना सर्हासर्पणे कायदा पायदळी तुडविला जातो आहे,

### गुन्हा दाखल करण्यास विलंब

सुरुवातीला गुन्हा दाखल करण्यास विलंब झाला, मात्र अखेर शनिवारी रात्री उशिरा पोलिस उपनिरीक्षक तावरे यांच्या फिर्यादीवरून उत्तमशेठ, दीपकशेठ, संजूशेठ, संतोषशेठ, रमेशशेठ, विष्णूशेठ, दत्तूशेठ, किशोरशेठ आणि अशोक राठोड या नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांच्या या धाडसी कारवाईने आरोपींचे धाबे दणाणले आहेत.दरम्यान लहान मुलांकडून काम करून घेणे कायद्याने गुन्हा आहे. असे असताना लहान मुलांकडून काम करून घेणे चांगलेच महागात पडले आहे.

## भारतीय बौद्ध महासभेच्या निवडी

**माया स्वामी,शारदा टाकणखार यांची वर्णी**





पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा बीड पुर्व च्या वतीन माजलगाव शहर शाखेच्या निवड़ी संदर्भान बैठकिचे आयोजन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व च्या अध्यक्षा आद.कमलताई डोंगरे यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाली त्या मध्ये भारतीय बौद्ध महासभेच्या शहर अध्यक्ष म्हणुन आद.मायाताई स्वामी यांची तर सरचिटणीस पदी आद.शारदाताई टाकणखार यांची निवड करण्यात आली या बरोबरच तालुका संरक्षण उपाध्यक्ष म्हणुन रेखाताई भारस्कर तर संरक्षण सचिव पदी आशाताई जावळे,सुनिताई टाकणखार यांची निवड करण्यात आली या बैठकिसाठी जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे ,लिलाताई उजगरे,संस्कार सचिव ,शामभाऊ वाघमारे,आशा ताई मोरे,जिल्हा पर्यटन सचिव के व्ही साळवे,एन बी राजभोज ,जिल्हा संघटीका शारदाताई तांगडे महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे,महिला तालुका सरचिटणीस कोमलताई डोंगरे,महिला तालुका कोषाध्यक्ष अनुराधाताई साळवे यांच्या सह शहरातील धम्म उपासिका उपस्तीत होत्या या ठिकाणी मान्यवरांकडुन नुतन कार्यकारणीस शुभेच्छा दिल्या व या निवडी मुळे शहरातील धम्म चळवळ गतीमान होईल आसी आशा व्यक्त करण्यात आली. दरम्यान मायाताई स्वामी आणि शारदाताई टाकणखार यांच्या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. आगामी काळात भारतीय बौद्ध महासभेचे कामकाज जोमाने करावे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केलेली भारतीय बौद्ध महासभा आंबेडकरी समूहासाठी अतिशय महत्वाची आहे. अशी अपेक्षा समाजातून व्यक्त होत आहे.